आता दै. लातूर प्रभात इंटरनेटवर
वाचा एका क्लिकवर
www.dainiklaturprabhat.in




दैनिक
# लातूर प्रभात

E-mail :- laturprabhat@gmail.com

मुख्य संपादक : रघुनाथ बनसोडे मो.नं.८८३०२ ५०६४५,

RNI No.: - MAHMAR/2017/72894 ● वर्ष ८ वे ● अंक २०७ वा ● शुक्रवार दि. १७ जानेवारी २०२५ ● किंमत २ रुपया ● पाने ४ ●




## झरोका

एक – अहो, सत्ताधारी विरोधी पक्षांमध्ये वाचाळवीराची भरती झाली असल्यामुळे उद्याच्या राजकारण आणि सत्ताकरण्याचे भवितव्य काय असेल हेच काही कळत नाही, डोकं बधिर झालं आहे.

दुसरा – अरे लोकसभा निवडणुकीच्या काळात प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी शरद पवार यांना भटकंती आत्मा म्हणून हिणविले होते. त्याचा परिणाम लोकसभेत भाजपाची पीछेहाट झाली तरी ही, नाक कापले तरी, श्वास चालूच आहे असे समजून, केंद्रीय गृहमंत्री अमित शहा हे शरद पवार यांना दगाबाज म्हणतात. त्यामुळे उद्याच्या निवडणुका लोकसभेचाच परिणाम दिसून येईल यात काही गैरे नाही. तू काळजी कशाला करतोस.

एक – अहो असे कसे म्हणून चालेल, मागील संसदीय कार्यकाळात संविधानावर चर्चा असताना याच अमित शहा यांनी डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर यांच्या संदर्भात आंबेडकर, आंबेडकर, असे म्हणणे एक फॅशन झाली आहे. अशी व वलंगणा केली होती. डॉक्टर मनमोहन सिंग यांच्या मृत्यू पश्र्चात ही अवहेलना केली गेली, आणि मग आज घडीला अमित शहा प्रधानमंत्री सांगण्याहून बरगळत आहेत हे कसे काय.

दुसरा – अरे, राष्ट्रवादी काँग्रेसचे शरद पवार निस्ती खासदार फोटो नाहीत महाविकास आघाडीत फूट पडत नाही म्हणून अमित शहा चिडलेले आहेत त्यामुळे ते असे बोलत राहतात. त्यामुळे अशा वाचावीरांच्या वक्तव्यावर जास्त लक्ष देणे गरजेचे नाही तू शांत बस.

एक – अहो, शरद पवार यांचे राजकारण भाजपाला पटत नसेल पण कठीण परिस्थितीत महाराष्ट्राला सावरण्याचा प्रयत्न शरद पवार यांनीच केलेला आहे. किल्लारीतील भूकंप मुंबईतील बॉम्बस्फोट किंवा मागील काळातील विद्यापीठ नामांतर प्रकरण असेल त्यावेळी दलित सुवर्ण ऐक्य घडवून संकट काळामध्ये महाराष्ट्राला सावरलेले आहेत. मग प्रधानमंत्री नरेंद्र मोदी असो, किंवा केंद्रीय गृहमंत्री अमित शाह असतो, त्यांनी शरद पवार यांच्या संदर्भात बोलू नये असे वाटते, त्यामुळे डोकं संताप ते आहे.

दुसरा – अरे, संत तुकोबांनी नाठाळाच्या माती, हणुकाठी असा संदेश अभंगातून दिला होता. त्यामुळे इथल्या सर्वसामान्य जनतेने संत तुकारामाचा संदेश अंगीकारून महाराष्ट्राला तंतोतंत उभे करण्यासाठी आपापले श्रम वेठीस लावलेले आहेत. त्यामुळे अशा वाचाळविरा बद्दल डोक्यांना ताण देण्याची गरज नाही. कारण महाराष्ट्र हा जातीवादी, धर्मांध शक्तीला पुरून उरणारा आहे. त्यामुळे मोदी, शहा सारखे किती भरकटले तरी महाराष्ट्र हा महाराष्ट्रच राहील हे आजवरच्या इतिहासाने दाखवून दिलेली आहे मग काळजी कशाला.

## काय बोलता राव ?

काँग्रेसचे खासदार राहुल गांधी यांनी राष्ट्रीय स्वयंसेवक संघाच्या मोहन भागवत यांच्या बद्दल जो जो देशद्रोहा शब्द वापरला आहे तो योग्यच वाटतो. परंतु आज घडीला भाजप नेतृत्व राहुल गांधी यांच्याच विरोधात आग ओळखत आहेत. हे काही कळतच नाही, मग मोहन भागवत खरे की राहुल गांधी खरे या संदर्भ प्रसारमाध्यमांनी आपापली भूमिका स्पष्ट करावी लागेल असे म्हटल्यास वावगे ठरू नये.

**काय बोलता राव !**

अरे, काँग्रेस आणि स्वातंत्र्यसैनिकामुळे भारत स्वातंत्र्य झाला. स्वतंत्र भारताचे प्रधानमंत्री नरेंद्र मोदी हेच असताना त्यांच्याच कार्यकाळात आयोध्येतील राम मंदिर राम लल्ला प्रतिष्ठापना झाली त्यावेळी राष्ट्रीय स्वंयसेवक संघाचे मोहन भागवत यांनी खऱ्या अर्थाने आजच भारत स्वतंत्र झाला असे बिनडोक वक्तव्य केले होते, तोच धागा पकडून काँग्रेसचे खासदार राहुल गांधी यांनी मोहन भागवत यांना देशद्रोह शब्द वापरला तर त्यात काय चुकीचे वाटते, परंतु भाजपाच्या लक्षात येतच नाही, भारत स्वातंत्र्य कसा झाला हा इतिहास मोडीत काढून मुक्या, बहिऱ्या पाशांनी राम मंदिराच्या नावाखाली त्याच दिवशी भारत स्वतंत्र झाला असे म्हणणे म्हणजे, नाकाने कांदे सोलण्यासारखेच असावे असे म्हटल्यास वावगे ठरू नये मग बोला दाजीबा.

# भटक्या विमुक्तांच्या पालावर जावून शासकीय सेवांचा लाभ देणे संवेदनशील प्रशासनाचे उदाहरण !

लातूर, : जिल्हा प्रशासनामार्फत भटक्या विमुक्तांना त्यांच्या पालावर जावून विविध शासकीय सेवांच्या लाभ देण्यात आला आहे. हा अपक्रम म्हणजे संवेदनशील प्रशासनाचे उत्तम उदाहरण असल्याचे नमूद करून छत्रपती संभाजीनगर विभागाचे राज्य लोकसेवा हक्क आयुक्त डॉ. किरण जाधव यांनी जिल्हाधिकारी वर्षा ठाकूर–घुगे यांच्या पुढाकाराने राबविण्यात आलेल्या या उपक्रमाचे कौतुक केले. जिल्हा प्रशासनाच्यावतीने ५५ शिबिरांचे आयोजन करून भटक्या विमुक्तांना विविध सेवांचा लाभ देण्यात आला आहे.





महाराष्ट्र लोकसेवा हक्क अधिनियम २०१५ अंतर्गत अधिसूचित करण्यात आलेल्या विविध सेवांच्या अंमलबजावणीची आढावा बैठक डॉ. जाधव यांच्या अध्यक्षतेखाली जिल्हाधिकारी कार्यालयाच्या नियोजन समिती सभागृहात झाली. जिल्हाधिकारी वर्षा ठाकूर–घुगे, जिल्हा पोलीस अधीक्षक सोमय मुंडे, जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी अनमोल सागर, लातूर शहर महानगरपालिका आयुक्त बाबासाहेब मनोहरे, प्रभारी अपर जिल्हाधिकारी संगीता टकले, प्रशिक्षणार्थी आयपीएस अधिकारी सागर खर्डे यांच्यासह विविध शासकीय विभागांचे अधिकारी यावेळी उपस्थित होते.

नागरिकांना शासनाच्या विविध सेवा, योजनांचा लाभ विहीत कालावधीत उपलब्ध करून देण्यासाठी महाराष्ट्र लोकसेवा हक्क अधिनियम तयार करण्यात आला. यानुसार राज्य शासनाच्या ६६२ सेवा अधिसूचित करून त्या ऑनलाईन स्वरूपात उपलब्ध करून देण्यात आल्या आहेत. तसेच त्यांची कालमर्यादा निश्र्चित करण्यात आली आहे. यामध्ये ग्रामपंचायत पातळीपासून ते जिल्हास्तरीय कार्यालयाशी संबंधित सेवांचा समावेश असून या सर्व सेवांसाठी नागरिकांना ऑनलाईन अर्ज करण्याची सुविधा आहे. या अर्जावर निर्णय घेण्यासाठी पदसिद्ध अधिकाऱ्यांची नेमणूक करण्यात आली आहे. या पदसिद्ध अधिकाऱ्यांनी आपल्याकडे ऑनलाईन स्वरूपात प्राप्त होणाऱ्या सर्व तक्रारींचा निपटारा विहीत कालावधीत करावा, अशा सूचना डॉ. जाधव यांनी यावेळी दिल्या.

अधिसूचित करण्यात आलेल्या काही सेवांमध्ये एकापेक्षा जास्त विभागांशी संबंधित काही सेवांचा समावेश आहे. अशा सेवांसाठी अर्ज प्राप्त झाल्यानंतर परस्पर समन्वयाने विहित कालावधीत असे अर्ज निकाली काढावेत. यासोबतच प्रथम अपिलीय अधिकारी यांच्या स्तरावर प्राप्त होणाऱ्या अपिलांचा निपटारा गतीने करावा. आपले सरकार सेवा केंद्रांमधून विविध सेवांसाठी अर्ज करता येतो, त्याचप्रमाणे अपीलही करता येतात. याबाबतचा फलक प्रत्येक आपले सरकार सेवा केंद्रामध्ये लावावा. तसेच आपले सरकार सेवा केंद्रामध्ये तक्रार पेटी लावून त्याची जबाबदारी संबंधित तलाठी यांच्याकडे द्यावी. या माध्यमातून प्राप्त तक्रारींचा वरिष्ठ अधिकाऱ्यांनी दरमहा आढावा घ्यावा, असे डॉ. जाधव यांनी सांगितले.

**विमुक्त जाती आणि भटक्या जमातीमधील व्यक्तींसाठी ५५ शिबिरे**

विमुक्त जाती आणि भटक्या जमातींसाठी जिल्हा प्रशासनाच्यावतीने जिल्ह्यात विविध ठिकाणी ५५ विशेष शिबिरांचे आयोजन करण्यात आले होते. या अंतर्गत भटक्या विमुक्तांच्या पालावर जावून त्यांना आधारकार्ड, रहिवास दाखला, जातीचे प्रमाणपत्र, आयुष्मान भारत कार्ड, मनरेगा जॉब कार्ड आदी शासकीय कागदपत्रे व सेवांचा लाभ देण्यात आल्याचे अपर जिल्हाधिकारी श्रीमती टकले यांनी आपल्या प्रास्तविकात सांगितले.

प्रारंभी जिल्हाधिकारी वर्षा ठाकूर–घुगे यांच्या हस्ते भारतीय संविधानाची प्रत देवून राज्य लोकसेवा हक्क आयुक्त डॉ. किरण जाधव यांचे स्वागत करण्यात आले. जिल्हाधिकारी कार्यालयातील हिरकणी कक्षाचीही डॉ. जाधव यांनी पाहणी केली.

राज्य लोकसेवा हक्क आयुक्त डॉ. किरण जाधव यांच्या हस्ते प्रातिनिधिक स्वरुपात ५ व्यक्तींना शासकीय प्रमाणपत्रांचे वितरण करण्यात आले. यामध्ये वैशाली सिरसीकर यांना उत्पन्न दाखला, सुनील ओव्हळ यांना उत्पन्न व रहिवासी दाखला, प्रशांत गायकवाड आणि विधान मस्के यांना जात प्रमाणपत्र, शंकर चळवाड यांना ज्येष्ठ नागरिक प्रमाणपत्र वितरीत करण्यात आले. सूत्रसंचालन उद्धव फड यांनी केले.

# भोकर महसूल प्रशासनाच्या वतीने रेती स्करांना रान मोकळे म्हणजे विनोदच

भोकर / सिद्धार्थ जाधव/ तालुक्यासह परिसरात मागील आनेक दिवसांपासून संबंधीत प्रशासनाच्या महीने ' वारी आशीर्वादाखाली रात्रीच्या गर्द अंधारात अवैध रेती तस्करीचा खेळ जोमात सूरु असून सर्वसामान्य नागरिकांना संबंधित अधिकारी व रेती तस्कर जुमानत नसल्यामुळे जिल्हा, विभाग, राज्यावरील वरीष्ठ अधिकाऱ्यांनाच यावर कार्यवाही करण्याची नितांत गरज बनली आहे.

नांदेड जिल्ह्यातील कुठल्याही रेती घाटावर सध्या रेती उत्खनन व वाहतुकीला परवानगी नसताना भोकर तालुक्यात रेती येतेच कशी असा सवाल उपस्थीत होत आहे. रेती तस्करांना महसूल प्रशासनाचे वरदहस्त लाभल्यामुळेच की काय ? त्यांना अच्छे दिन येऊन ते कुणालाही न जुमानता विना नंबर प्लेट हायवा, टिपर व ट्रॅक्टरच्या माध्यमातून शेकडो ब्रास वाळूची तस्करी करत आहेत . यातून शासनाचा लाखो रुपयांचा महसूल बुडत असताना महसूल प्रशासनाला मात्र कसलाही फरक पडत नाही म्हणजे विनोदच म्हणावा लागेल.दूसरीकडे स्थानीक महसूल विभाग यंत्रणेतील सबंधित आधिकारी हे माञ मालामाल होत आहेत हे विशेष. त्यांनी जमवलेल्या बेहिशोबी मालमत्तेची गोपनीय चौकशी केल्यास मोठे घबाड उघडे होईल.

भोकर फाटा ते बारड पोलीस नाका पार करून आमदरी ,नारवाट,उमरी, मुदखेड रोड मार्गे शेकडो ब्रास वाळूची अवैध वाहतूक होत आहे.विशेष म्हणजे,वाळू वाहतूक करणाऱ्या हायवा टिप्पर व ट्रॅक्टरांचे नंबर प्लेट काढून टाकण्यात आलेले आहेत असे का केले जाते हे अनुत्तरीत आहे. परिवहन विभागाला व वाहन पोलीस प्रशासनास माहिती असूनही कार्यवाही होत नाही हे आश्र्चर्यच! अवैध वाळू तस्करांत कोणाचीच भीती राहिलेली नाही त्यांच्या भरधाव धावणाऱ्या हायवा टिपर वाहणास कोणी हटकवल्यास मुजोरीची भाषा वापरुन तसेच हायवा अंगावर घालून जीवे मारण्याची धमकी दिली जात आहे. रेती तस्करा विरोधात पोलिसात तक्रार केली तर महसूल प्रशासनाकडे बोट दाखवल्या जाते आणि महसूल प्रशासनाकडे तक्रार केल्यास पोलीसात कार्यवाही करा असे सांगून बनवाबनवी केल्या जाते.लोकांनी रेतीची गाडी थांबवून महसुल विभागास कळविल्या उपरही कार्यवाहीसाठी तहसिलदार, नायब तहसिलदार अथवा कोणी जिम्मेदार कर्मचारी कार्यवाहीसाठी येत नाहीत. येथे महसुलचे भरारी पथक नावालाच नेमण्यात आले आहे का ..? असा प्रश्र्न निर्माण होत आहे.हे भरारी पथक रात्रभर कुठे कर्तव्य बजावतो हे त्यांनाच माहीत! महसूलच्या भरारी पथकातील एकाही अधिकारी व कर्मचाऱ्यांचे भ्रमण ध्वनी क्रमांक व वेळापत्रक सार्वजनिक करण्यात आले नाहीत .रेती तस्करांची नेमकी तक्रार कुणाकडे करावी असा गंभीर प्रश्र्न सध्या तालुक्यात निर्माण झाला आहे. पत्रकार व काही सुजान नागरिकांकडून रेती तस्करांना हटकिवल्यास संबंधित प्रशासनातील आधिकारी यांना हप्ते देतो त्यामुळे आमचे कोणीही काही वाकडे करू शकत नाही अशी मुजोरीची भाषा वापरत अंगावर चालून येतात अश्या तक्रारी समोर आल्या आहेत.. रेतीच्या ओव्हरलोड वाहतुकीमुळे परिसरातील चांगल्या रस्त्यांची पुरती वाट लागत आहे. परिवहन विभागाचेही तोंडावर बोट आहे. सूर्यास्तानंतर सूर्योदयापर्यंत गोण खनिज उत्खनन व चोरटी रेती वाहतूक यास पूर्णतः बंदी असताना माजी मुख्यमंत्री अशोकराव चव्हाण यांच्या भोकर विधानसभा मतदारसंघात माञ प्रशासनातले अधिकारी कायदाच पायदळी तुडवण्याचा चंग उराशी बाळगला आहे अर्थात कुंपणच शेत खात असेल तर तक्रार कुणाकडे करावे असा यक्ष प्रश्र्न यानिमित्ताने नागरिकांपुढे निर्माण झाला आहे. दरम्यान रेती तस्करी वर आळा कोण घालणार ? चोरांवर कार्यवाही करणारेच महाचोर निघाले असतील तर त्याचे काय?भरधाव वेगात पळवल्या जाणाऱ्या रेतीच्या वाहनांमुळे अपघाताच्या प्रमाणात प्रचंड वाढ झाली आहे नुकतेच खरबी येथे सकाळी व्यायामासाठी महामार्गावर गेलेल्या दोन महाविद्यालयीन मुलांना उडविण्यात आले हे रेती तस्करीचाच परिपाक आसल्याचे बोलल्या जाात आहे.या मुलांना विना नंबर प्लेट रेती वाहतूक करणाऱ्या टिप्परने चिरडल्याचा संशय परिसरातील नागरिकात व्यक्त होत आहे. विना नंबर प्लेट व अतिवेगात चालणाऱ्या वाहनांवर परिवहन विभागाकडून कार्यवाही होणे गरजेचे बनले आहे. रात्री अपरात्री बेफाम चालणाऱ्या या वाहनांमुळे मोठें येणाऱ्या काळात मोठे अपघात होण्याची शक्यता वर्तवली जात आहे.परिवहन विभागाकडूनही याप्रकरणी कार्यवाही करण्याची गरज निर्माण झाली आहे. स्थानिक भ्रष्ट अधिकाऱ्यांना हाताशी धरून पर्यावरणाचे नुकसान करण्यासह शासनाच्या महसुलावर दरोडा टाकला जात आहे. विभागीय आयुक्त,जिल्हाधिकारी व जिल्हा पोलिस अधीक्षकांनीच यावर आवर घालण्याची गरज निर्माण झाली आहे.

**महसुल चे भरारी पथक नावालाच !**

जिल्ह्यात अवैध वाळू उपसा व वाहतुक यावर अंकुश आणण्यासाठी जिल्हाधिकारी अभिजीत राऊत व पोलीस अधीक्षक अबिनाश कुमार ऑपरेशन फ्लॅश आउट या अंतर्गत यांनी वेगवेगळे भरारी पथके नेमून वाळू तस्करीवर यासह विविध अवैध धंद्यावर अंकुश आणण्याच्या सूचना जिल्ह्यातील सर्व तहसिल कार्याल पोलीस ठाण्यास देण्यात आल्या आहेत मात्र वरिष्ठांच्या आदेशांना बगल देत येथील तहसीलदार विनोद गुंडमवार यांनी आपल्या अधिपत्याखालील व मर्जीतील अधिकारी कर्मचारी व कोतवालाना भरारी पथकात नेमून नावाला भरारी पथक तयार करण्याचा अट्टाहास केला आहे. नेमलेले भरारी पथक नेमके रात्रभर काय करतो कुठे रहातो याचा थांगपत्ता नागरिकांना नाही. भरारी पथकातील कर्मचारी व अधिकाऱ्यांचे संपर्क नंबर व वेळापत्रक सार्वजनिक करण्यात आले नाहीत त्यामुळेच प्रशासनात सहकार्य करण्यास अवघड जात आहे. अवैध रेती वाहतुकीमुळे प्रशासनाचे महसूल तर बुडत आहेच ओव्हरलोड गाड्यांमुळे रस्ते खराब होत आहेत. अनेक अपघात होत आहेत यासह पर्यावरणाचे नुकसान होत आहे. वाळू माफियांना तहसिलदार यांचा वरदहस्त असल्यामुळेच रेती तस्करी सूरु असून वाळूमाफियांकडून नागरिकांवर हल्यासारखे गंभीर प्रकार घडत आहेत परिसरात वाळूमाफियांची दादागिरी वाढली आहे. रेती पुरवणाऱ्या दलालाचे महसूल प्रशासनात सख्खे निर्माण झाले असून प्रशासनाकडून त्यांना सन्मानजनक वागणूक देण्यात येत आहे. रेती तस्करी विरोधात बातमी वा माहिती देणाऱ्या पत्रकारांना जीवे मारण्याची धमकी त्यांच्यामार्फत देण्यात येत आहे. नुकतेच तहसीलच्या आवारात लावण्यात आलेल्या रेतीच्या हायवावर काय कार्यवाही झाली याची माहिती न देताच सोडून देण्यात आल्याचे खात्रीलायक माहिती आहे. महसूल विभागाने रात्रीसाठी पथके नेमली असताना सुद्धा शहरात व तालुक्यात अवधरीती वाहतूक होतेच कशी असे अनेक प्रश्र्न नागरिकात निर्माण झाले आहेत. तालुक्यात होत असलेल्या अवैध रेती वाहतुकीची सखोल चौकशी व्हावी अशी मागणी जनसामान्यातून होत आहे.

# नागरिकांना शासकीय सेवा मोबाईलच्या माध्यमातून उपलब्ध करून द्याव्यात - मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस

मुंबई : राज्यातील नागरिकांना जास्तीत जास्त शासकीय



सेवा मोबाईलच्या माध्यमातून उपलब्ध झाल्या पाहिजेत. त्यासाठीची ऑनलाईन प्रणाली विकसीत करावी, अशी सूचना मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दिली.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या अध्यक्षतेखाली आज राज्य मंत्री परिषदेची बैठक झाली. या बैठकीत उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्यासह, कॅबिनेट आणि राज्य मंत्री उपस्थित होते.

यावेळी मुख्यमंत्री श्री. फडणवीस म्हणाले की, राज्यातील विविध विभागांच्या ९६९ सेवा अधिसूचित करण्यात आल्या आहेत. त्यापैकी आपले सरकार पोर्टल वर ५३६ सेवा उपलब्ध आहेत. ९० सेवा संबंधित विभागांच्या पोर्टल वर उपलब्ध आहेत. मात्र सुमारे ३४३ सेवा ऑफलाईन पद्धतीने दिल्या जातात. या सर्वच सेवा आपले सरकार पोर्टलवर उपलब्ध करून द्याव्यात. ज्या सेवा सध्या ऑफलाईन पद्धतीने दिल्या जातात त्या सर्व ऑनलाईन करण्यासाठी माहिती तंत्रज्ञान विभागाने पुढाकार घ्यावा. येत्या शंभर दिवसात हे काम पूर्ण करा. अनेक सेवा अधिसूचित करण्यात आलेल्या नाहीत, त्या सर्व सेवा अधिसूचित करण्यासाठी संबंधित मंत्री आणि सचिवांनी पुढाकार घ्यावा. नागरिकांना सुमारे ९९ टक्के शासकीय सेवा मोबाईलच्या माध्यमातून उपलब्ध झाल्या पाहिजेत. यामुळे नागरिकांना शासकीय कार्यालयात वारंवार जाण्याची आवश्यकता भासणार नाही, असेही त्यांनी सांगितले.

राज्यात आपण 'ईज ऑफ डूईंग बिझनेस' संकल्पनेवर काम करण्यावर भर देत आहोत. त्यानुसार अधिकारांचे विकेंद्रीकरण करण्यावर भर दिला पाहिजे. क्षेत्रीय स्तरावरील अधिकार शासनाकडे केंद्रीत केले जाऊ नये, असे मुख्यमंत्री श्री. फडणवीस यांनी सांगितले.

बुलडाणा जिल्ह्यातील केस गळतीच्या घटनांबाबत मंत्री परिषदेत चर्चा झाली. केस गळती झालेल्या लोकांच्या अन्न आणि पाण्याचे नमुने घेतले आहेत. सकृतदर्शनी हे प्रकार बुरशीच्या प्रादुर्भावामुळे होत असल्याचे निदर्शनास येत आहे. बाधित नागरिकांना औषधे आणि मलम वितरित करण्यात आले आहेत. त्यामुळे केस गळतीच्या प्रमाणात घट झाली असल्याचे स्पष्ट होत आहे, अशी माहिती आरोग्य विभागाच्यावतीने देण्यात आली. यावर अशा प्रकारांबाबत आरोग्य विभागाने सतर्क रहावे. तातडीने आवश्यक त्या उपाययोजना कराव्यात. तसेच अशाच प्रकारच्या घटना वर्धा येथे आढळून येत आहेत. त्याकडेही लक्ष द्यावे, अशा सूचना मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दिल्या.

## दयानंद विज्ञानमध्ये पुस्तक परीक्षण व कथन स्पर्धा

लातूर : येथील दयानंद विज्ञान महाविद्यालयातील भाषा विभाग व ग्रंथालय यांच्या संयुक्त विद्यमाने दि.१० जानेवारी २०२५ रोजी ' वाचन संकल्प महाराष्ट्राचा ' अंतर्गत महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.सिद्धेश्र्वर बेल्लाळे यांच्या मार्गदर्शनाखाली महाविद्यालयस्तरावर पुस्तक परीक्षण व कथन स्पर्धेचे आयोजन करण्यात आलेले होते.

या स्पर्धेमागचा मुख्य उद्देश असा होता की,विद्यार्थ्यांना मराठी,हिंदी आणि इंग्रजी भाषेतील पुस्तक वाचनाची आवड व गोडी निर्माण व्हावी,पुस्तक परीक्षण लेखनाच्या माध्यमातून लेखन कौशल्य वृध्दिंगत व्हावे आणि पुस्तक कथनाच्या माध्यमातून बोलण्याचे कौशल्य व धाडस निर्माण व्हावे हा होता.या स्पर्धेप्रसंगी इंग्रजी विभाग प्रमुख प्रा.मेघा पंडित,हिंदी विभागप्रमुख डॉ. गजानन बने,मराठी विभाग प्रमुख डॉ.रामशेट्टी शेटकार,ग्रंथपाल प्रा.किरण भिसे, आयक्यूएसी समन्वयक डॉ.जमन अंगुलवार,डॉ.चंद्रशेखर स्वामी,डॉ.मनीषा गुरमे,दिलीप राठोड यांची प्रमुख उपस्थिती होती.

सदरील स्पर्धेमध्ये बी.एस्सी.तृतीय वर्षातील श्रेया मुंडे या विद्यार्थीनीने प्रथम क्रमांक पटकाविला.बी.एस्सी.द्वितीय वर्षातील प्रांजली स्वामी हिने द्वितीय क्रमांक मिळविला तर बीसीएस प्रथम वर्षातील परमेश्र्वर मुंढे यांनी तृतीय क्रमांक मिळवला.या स्पर्धेत प्रथम, द्वितीय व तृतीय क्रमांक आलेल्या विद्यार्थ्यांना अनुक्रमे ७००/- ,५००/- व ३००/- रूपयांचे बक्षीस आहे.या स्पर्धेसाठी डॉ.चंद्रशेखर स्वामी यांनी परीक्षक म्हणून काम पाहिले. या स्पर्धेचे प्रास्ताविक व सूत्रसंचालन डॉ.रामशेट्टी शेटकार यांनी केले तर आभार प्रा.मेघा पंडित यांनी मानले.

# प्रशासनातही जात घुसते तेंव्हा ?

### संपादकीय...

बिहार, उत्तर प्रदेश आणि तत्सम प्रदेशात कार्यालयीन व अन्य कारणासाठी वास्तव किंवा प्रवासाच्या अनुभव असलेल्या त्याच्या प्रांतातील माणसे एकमेकास आपण कोणत्या जातीतचे आहोत असे सहज विचारून जातात. त्या त्या राज्यात जात विचारण्याला त्यांना कमीपणा वाटत नाही. परंतु विद्यमान महाराष्ट्रात जिथे जात आणि धर्माला थारा नाही, पुरोगामी आणि धर्मनिरपेक्ष विचारातून फुले शाहू आंबेडकर यांच्या वारसा घेऊन चालणाऱ्या आजचा महाराष्ट्र कोणत्या दिशेने वाटचाल करू लागला आहे, हा प्रश्न गंभीर पडतो आहे.

स्वतंत्र पूर्व काळात भारतात जात हा घटक होताच स्वातंत्र्यानंतर जात धर्माच्या नावावर राजकीय, सामाजिक सत्ताकारण करीत असले तरी, जात आणि धर्माला नाममात्र महत्व राहिले आणि लोकशाही धर्मनिरपेक्षतेच्या माध्यमातून डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर लिखित भारतीय राज्यघटनेवर कारभार सुरू झाला. पण आज घडीला लोकशाही संविधानावरच चालणाऱ्या प्रशासन आणि पोलीस यंत्रणेत जात घुसते आहे, तर मग लोकशाही संविधानाचे काय हा प्रश्न अनुत्तरीतच राहतो.

आज घडीला महाराष्ट्रामध्ये वाल्मिक कराड आणि भाजपाचे सुरेश धस यांच्यामध्ये ओबीसी, मराठा संघर्ष होतो आहे, कराड आणि मुंडे हे दोघे वंजारी असले तरी भाजपाचे आमदार सुरेश सदस्य देशमुख संतोष देशमुख हे मराठा आणि भाजपाचे सुरेश धस हे मराठा असल्यामुळे मराठा ओबीसी संघर्ष सुरू झाला असून प्रशासनात जात घुसल्यामुळे फडणवीस सरकार मात्र अडचणीत सापडल्याचे दिसते आहे, कारण ओबीसी, मराठा हा घटक पक्ष मागासवर्गीयांना बरोबर घेऊन समाजकारण सत्ताकारण, राजकारण करणार आहे. त्यामुळे ओबीसीची प्रतिनिधित्व छगन भुजबळ यांना डावलून धनंजय मुंडे यांना जवळ केले गेले मागासवर्गीय दलित समाजातून भाजपाच्या आमदाराला प्रतिनिधित्व दिले गेले असले तरी, दलितास न्याय म्हणून केंद्र सरकारमध्ये रामदास आठवले कार्यरत आहेत, त्यामुळे सरकारने प्रशासनात जात महत्त्वाचाच फॅक्टर ठरतो आहे, त्यामुळे प्रसार माध्यमात चिंता व्यक्त होताना दिसत आहे.

वाल्मीक कराड हा कोणी असो जाती पलीकडे जाऊन त्यांचे जे वर्तन आहे ते महाराष्ट्राच्या संस्कृतीला काळीमा फासणारेच आहे. गुंड, झुंडशाहीच्या माध्यमातून वाल्मीक कराड ने आजवर जे काही केले आहे, त्याचे कौतुक कोणीही करू शकत नाही. ही बाब गंभीर असली तरी, आज घडीला प्रशासन आणि पोलीस यंत्रणेत जातीचा विचार अग्रक्रमाने घेतला जातो आहे, त्यामुळे जातीचा हिशोब खुलेआमपणे मांडला जात असून राजकीय पक्षातील वेगवेगळ्या जात घटकाचे सेल कार्यरत असल्याने त्यामुळेच आज घडीला कराड, मुंडे आणि सुरेश धस यांचे प्रमाण जातीच्या भोवती घुटमळते आहे त्यामुळे बिहार, उत्तर प्रदेश व अन्य राज्याप्रमाणे महाराष्ट्रातही प्रशासनाने पोलीस यंत्रणेत कार्यरत असताना जात ही कपाळावर लिहून ठेवूनच कार्यरत राहावे लागेल की काय, हा धोका टाळता येण्यासारखा नसावा शहाण्या व्यक्तींनी जातीच्या व्यसनाचा आधार घ्यावा हे महाराष्ट्राच्या राजकारण सत्ताकारणाला अशोभणीय वाटते. परंतु मूर्खपणाच्या निश्र्चयांकस अंत नसतो हेच आज घडीला महाराष्ट्राचे प्रशासन व पोलीस यंत्रणेस आणि राजकारणात जात ही घट्ट बनते आहे. मग प्रशासनात जात घुसते तेव्हा सर्वसामान्य जनतेचे काय होईल, हा प्रश्न बाजूलाच पडतो याबद्दल दुसरे काही बोलने नाही.

## रेणापूर येथील शासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्थेस आ. कराड यांच्या प्रयत्नातून मुर्गाप्पा खुमसे यांचे नाव

लातूर - मराठवाडा मुक्ती संग्राम लढ्यातील लढवये स्वातंत्र्य सेनानी रेणापूरचे भूमिपुत्र मुर्गाप्पा खुमसे यांचे सत्याग्रह, त्याग, कष्ट आणि कार्य अनेकांना प्रेरणादायी असून भावी पिढीला स्फूर्ती मिळावी यासाठी भाजपाचे नेते आ. रमेशआप्पा कराड यांच्या प्रयत्नामुळे स्व. खुमसे यांचे नाव रेणापूर येथील शासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्थेस देण्याचा निर्णय राज्यातील महायुती शासनाने नुकताच घेतला आहे.



युवकांना रोजगाराभिमुख प्रशिक्षण देवून त्यांना रोजगार व स्वयंरोजगारासाठी सक्षम बनविणे व खाजगी औद्योगिक आस्थापनांना लागणाऱ्या कुशल मनुष्यबळाचा पुरवठा करण्याच्या उद्देशाने शासकीय व खाजगी औद्योगिक प्रशिक्षण संस्थांमार्फत (आयटीआय) प्रशिक्षण देण्यात येते. या प्रशिक्षण संस्थांच्या नावात ८ ऑक्टोबर, २०२४ रोजीच्या शासन निर्णयानुसार नेमण्यात आलेल्या एकसदस्यीय समिती त्या जिल्हयाचे पालकमंत्री यांच्याशी विचारविनिमय करुन नावात बदल करणेबाबत निर्णय घेण्यात घेण्यात आला. त्या अनुषंगाने १३२ शासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्थांची नावे बदलण्याबाबत बाब शासनाच्या विचाराधीन होती.

भाजपाचे नेते लातूर ग्रामीण विधानसभा मतदारसंघाचे आ. रमेशआप्पा कराड यांनी शेतकरी, शेतमजूर, दिन दुबळे आणि मागास घटकासाठी सातत्याने लढा उभारणारे, निजामाच्या जुलमी राजवटीविरुद्ध आवाज उठवणारे, मराठवाडा मुक्ती संग्राम लढायातील लढवये ज्येष्ठ स्वातंत्र्य सेनानी स्व. मुर्गाप्पा खुमसे यांचे कार्य, सत्याग्रह प्रेरणादायी असल्याने भावी पिढीला स्फूर्ती मिळावी यासाठी रेणापूर येथील औद्योगिक प्रशिक्षण संस्थेस रेणापूर येथील स्वातंत्र्य सैनिक स्वर्गीय मुर्गाप्पा खुमसे यांचे नाव देण्यात यावे याकरिता संबंधितांकडे पाठपुरावा केला. आ. कराड यांनी केलेल्या पाठपुराव्यानुसार रेणापूर सह राज्यातील १३२ शासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्थाचे नांव बदलण्यास महायुती शासनाच्या कौशल्य रोजगार उद्योजकता व नाविन्यता विभागामार्फत १५ जानेवारी २०२५ रोजी च्या शासन निर्णयानुसार मान्यता दिली आहे.

रेणापूर येथील औद्योगिक प्रशिक्षण संस्थेस मुर्गाप्पा खुमसे यांचे नाव देण्यासाठी प्रयत्न केल्याबद्दल भाजपा नेते आ. रमेशआप्पा कराड यांचे रेणापूर येथील स्वातंत्र्य सैनिक कल्याण मंडळाचे उपाध्यक्ष सोमनाथ रोडे, सचिव के. ई. हरिदास, प्रा. भारत संपत्ते यांच्यासह भाजपाचे नवनाथ भोसले, अनिल भिसे, महेंद्र गोडभरले, दशरथ सरवदे, रेणापूरचे माजी नगराध्यक्ष अभिषेक आकनगिरे, अनंत चव्हाण, सतीश आंबेकर, वसंत करमोडे, बाबासाहेब घुले, चंद्रकांत कातळे, शरद दरेकर, अच्युत कातळे, विजय चव्हाण, श्रीकृष्ण मोठेगावकर, दत्ता सरवदे, सुधीर तोडकरी, उत्तम चव्हाण, महेश गाडे, मनोज कराड, अमर चव्हाण, संतोष राठोड, जयप्रकाश हलकुडे, श्रीकृष्ण जाधव, सुकेश भंडारे, माऊली भिसे, शेख अजीम, राजकुमार आलापुरे, सिद्धेश्र्वर मामडगे, नामदेव बोबडे, राजू रायवाडे, श्रीकृष्ण पवार, लक्ष्मण यादव, नरसिंग येलगटे, रमाकांत फुलारी, निवृत्ती चिद्रे, गणेश माळेगावकर तालुक्यातील स्वातंत्र्य सैनिकाच्या परिवारातील सदस्य आणि भाजपाच्या लोकप्रतिनिधी व कार्यकर्ते आभार व्यक्त केले आहेत.

## सांदीपनी टेक्निकल कॅम्पसच्या १०६ विद्यार्थ्यांची विविध कंपन्यांच्या कॅम्पस मुलाखतीत निवड

लातूर : लातूर - नांदेड महामार्गावरील कोळपा येथील सांदीपनी टेक्निकल कॅम्पस फॅकल्टी ऑफ इंजिनीअरिंग आणि पॉलिटेक्निकच्या १०६ विद्यार्थ्यांची विविध कंपन्यांच्या कॅम्पस मुलाखतीत निवड झाली आहे.



या कॅम्पस मुलाखतीसाठी जागतिक पातळीवरील झेप्टो, इपिटोम कॉम्पोनन्ट्स , बजाज ऑटो, वरॉक इंजिनीअरिंग, स्कॅफ्लेर इंडिया लि ., जर्मन कंपनीसारख्या नामांकित कंपन्यांचे प्रतिनिधी उपस्थित होते. मागच्या १५ दिवसात या सर्व कंपन्यांच्या कॅम्पस मुलाखतीत सांदीपनी टेक्निकल कॅम्पसच्या एकूण १०६ विद्यार्थ्यांची निवड करण्यात आली. आगामी काळात अनेक कंपन्या कॅम्पस प्लेसमेंटसाठी येणार आहेत. महाविद्यालय व्यवस्थापन, प्राचार्य, उपप्राचार्य, प्रशिक्षण आणि प्लेसमेंट अधिकारी त्यांच्या अंतिम वर्षाच्या विद्यार्थ्यांसाठी शंभर टक्के प्लेसमेंटसाठी नियोजन करत आहेत. या सर्व यशस्वी विद्यार्थ्यांचे संस्थेचे अध्यक्ष विनोद अग्रवाल, उपाध्यक्ष डॉ. अनिल राठी, प्राचार्य डॉ.संजीवनी कुलकर्णी मॅडम, डॉ.उद्धव बडगिरे, प्रशिक्षण व प्लेसमेंट अधिकारी सुनील खंडेलवाल यांसह सर्व विभाग प्रमुख, शिक्षक आणि शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनी अभिनंदन केले आहे.

# क्रिया व प्रतिक्रिया संघर्ष

गोध्रा हत्याकांड २००२ चे समर्थन करताना अगदी मोठ्या मान्यवर नामवंतांनी स्पष्टपणे मत व्यक्त केले होते की , क्रिया विरोधात प्रतिक्रिया उमटणे अगदी साहजिक आहे . यात प्रामुख्याने आर एस एस व भाजपचे नेते पुढे होते . आजही हेच नॅरेटिव्ह सुरू आहे . बाबरी मशीद जमीनदोस्त केल्यापासून भारतातील कर्मठ हिंदू व कर्मठ मुस्लिम ३२ वर्षे झाली तरी आग विझू देत नाहीत . सुमारे आठव्या शतकापासून भारतावर एक हजार वर्षे वेगवेगळ्या मुस्लिम राजवटींनी हल्ले केले व सत्ताधिश झाले होते . असे असतानाही फक्त पंधरा सोळा टक्के लोकसंख्या मुस्लिम आहे . थोडक्यात सोळा टक्के मुसलमान पंचाऐंशी टक्के हिंदूंना भारी पडू शकत नाही . दूसरे असे की यात एकही मुस्लिम आक्रमक तुर्क अरब अफगाणी इराणी नाही . ते सर्वच धर्मांतरित मूळचे हिंदू आहेत . असे आर एस एस चे प्रमुख डॉ मोहन भागवत यांनी जाहीरपणे सांगितले आहे . त्यांचे पूर्वज पुन्हा हिंदू धर्मात परत येण्यासाठी तयार होते . परंतू हिंदू धर्मरक्षकांनी विरोध केला होता . एक है तो सेफ है व बटेंगे तो कटेंगे हे नारे ऐकून जर हिंदू एकत्रित येऊन संघटित होत असतील तर हेच नारे ऐकून मुस्लिम संघटित होणे शक्य आहे . दोन्ही प्रकरणांत व्होट जिहाद मानले जाऊ शकते . असे असले तरी मुस्लिम भाजपला मतदान करत नाहीत असे मानले जाते . म्हणजेच हिंदू मतं भाजप व काँग्रेस मध्ये विभाजित होतात . तर मुस्लिम मते एकगठ्ठा काँग्रेसच्या मागे जातात असे नॅरेटिव्ह सेट केले आहे . भारतीय संविधान नुसार भारतीय मुस्लीम हे स्वतंत्र भारताचे नागरिक आहेत . हिंदू प्रमाणेच मुस्लिमांना आपल्या धर्मानुसार धार्मिक सांस्कृतिक कार्यक्रम आयोजित करण्याचे अधिकार आहेत . तसे स्वातंत्र्य आहे . तरीही ताणतणाव व धार्मिक दंगली सुरू आहेत . २०१४ पासून यात भर पडली आहे . परिणामी देश मागे जात आहे . १९२३ मध्ये सावरकरांनी हिंदुत्व हे पुस्तक लिहिले होते . ते वाचून हेडगेवार यांनी १९२५ मध्ये आर एस एस ची स्थापना केली . त्यानंतर सावरकर चाळीस वर्षे जगले . पण चूकूनही आर एस एस सोबत गेले नाहीत . कारण स्वतः सावरकर प्रचंड बुद्धीप्रामाण्यवादी व सुधारणावादी होते . गाय एक उपयुक्त पशू आहे असे सावरकर मानत . तसेच हिंदू धर्मातील जूनाट कालबाह्य परंपरा तसेच सप्त बंदी संपवली पाहिजे अशी मागणी होती . या कारणाने आर एस एस व सावरकर एकत्र आले नाहीत . भाजपचे नेते एकतर्फी प्रेम प्रदर्शित करतात .

मध्ययुगीन काळात मंदिर मशीद चर्च यासारख्या वास्तु सोने चांदी व पैसा साठवण्याची जागा होती . त्यामुळेच आक्रमक धार्मिक स्थळांवर आक्रमण करून लूट करत होते . एवढेच नाही तर त्यासाठी एक मंत्री व विभाग असे . भारत देश सुजलाम सुफलाम असल्याने सरप्लस अन्नधान्य होते . त्यामुळेच आपल्याला आक्रमण करून बाहेर जाण्याची गरज भासली नाही . भारतावर जेवढे मुस्लिम आक्रमणे झाली होती ते प्रामुख्याने अन्नधान्य व संपत्ती लुटण्यासाठी होते . मशीद बांधणी वा मंदिर तोडून मशीद उभारणी ही पध्दत होती . असे असले तरी अगदी सरसकटपणे मंदिर उध्वस्त केले होते असे दिसत नाही . याच कारणाने कदाचित १९९१ मध्ये एक कायदा आणला . १९४७ मध्ये भारतात जून्या धार्मिक स्थळांची जी अवस्था असेल त्यात बदल करु नये . असे असतानाही अजमेर शरीफ , संभल मशीद व असंख्य दर्गे , मुस्लिम वास्तू मूळ हिंदू मंदिरे असल्याचे दावे केले जातात . कोर्ट व सरकार देखील याला प्रोत्साहन देताना दिसतात . या कारणाने धार्मिक दंगली वाढत आहेत . गोमांस , मॉब लिंचींग , लव्ह जिहाद अशा अनेक कारणांनी धार्मिक वाद निर्माण केले जात आहेत . याचा दुष्परिणाम म्हणून जगात एक समज पसरला आहे की भारतात मुस्लिम ख्रिश्र्चन शिख बौद्ध जैन अल्पसंख्याक समाज भितीग्रस्त व असुरक्षित आहेत .

वर्तमानात जगभरातील सर्वच देशांमध्ये मोठ्या संख्येने भारतीय हिंदू समाज उद्योग नोकरी व्यवसाय यासाठी स्थायिक झाले आहेत . त्यांच्यासाठी तेथे मंदीर बांधले आहेत . त्यासाठी अमेरिका युरोप इंग्लंड आष्ट्रेलिया या ख्रिश्र्चन तर अबुधाबी , इंडोनेशिया , मलेशिया , बांगलादेश , कतार अशा मुस्लिम देशांमध्ये हिंदू मंदिरे उभारली आहेत . भारतात जर हिंदू व मुसलमान दंगली वाढत राहिल्या तर मुस्लिम देशांमध्ये हिंदू मंदिरे व हिंदू समाजाला टार्गेट केले जाऊ शकते . सध्या बांगलादेश मधील इस्कॉन मंदिर व पंडित यांच्या वरील हल्ले यामुळे होत असावेत . काही वर्षापूर्वी मुंबई येथे अमराठी उत्तर प्रदेश व बिहार मधील कामगारांना काही संघटनांनी बरीच मारहाण केली होती . या विरोधात उत्तर प्रदेश व बिहार मध्ये तेथील मराठी भाषिकांवर हल्ले झाले होते . यावरून असे म्हणायला हरकत नाही की भारतात जर मुस्लिम समाजावर , मशीदीवर हल्ले झाले तर प्रतिक्रिया म्हणून जगभरातील मुस्लिम देशांमध्ये हिंदू मंदिरे व हिंदू समाजाला देखिल त्रास होऊ शकतो . यात भारताचे सर्वात जास्त नुकसान होईल . मुस्लिम देश दुबई अबुधाबी कतार ओमान सौदी अरेबिया कुवेत इराण इत्यादी अनेक मुस्लिम देशांमध्ये हजारो भारतीय नागरिक कार्यरत आहेत . ते करोडो रुपये भारतात पाठवतात . यात बहुसंख्येने मुस्लिम बांधव आहेत . हे विस्कळीत होऊ शकते .

असे व्हायचे नसेल तर दोन्ही बाजूकडून क्रिया व प्रतिक्रिया हा संघर्ष पूर्णपणे थांबला पाहिजे अशी अपेक्षा आहे .

धन्यवाद व सदिच्छा .

**पुरुषोत्तम खेडेकर चिखली .**
**मोबाईल --९८२३६९३२२७ .**

# स्टार्टअप इंडिया : इकोसिस्टमला प्रोत्साहन

स्टँड-अप इंडिया ही योजना महिला आणि अनुसूचित जाती व अनुसूचित जमाती समुदायातील उद्योजकतेला पाठिंबा देण्यासाठी ५ एप्रिल २०१६ रोजी भारत सरकारने सुरू केली. हे स्टार्टअप इंडिया सामान आहे पण या योजनेचे भाग नाही. या दोनही योजना मेक इन इंडिया, इंडस्ट्रियल कॉरिडोर, डेडिकेटेड फ्रेट कॉरिडोर, सागरमाला, भारतमाला, उडान-आरसीएस, डिजिटल इंडिया, भारतनेट आणि उमंग या भारत सरकारच्या इतर योजनांचे समर्थक व लाभार्थी आहेत. या योजनेअंतर्गत अनुसूचित जाती आणि अनुसूचित जमाती आणि महिला दरम्यान १० लाख आणि १ कोटी योजना ऑफर बँक कर्ज शेती क्षेत्राचा बाहेर नवीन उपक्रम सेट चा समावेश आहे.

स्टार्टअप म्हणजे अशी संस्था ज्याचे मुख्यालय भारतात आहे, १० वर्षांपूर्वी उघडले गेले आहे आणि ज्याची वार्षिक उलाढाल १०० कोटी पेक्षा कमी आहे. या योजनेसाठी सुरुवातीला २०००० कोटी रुपयांचा निधी देण्यात आला आहे. स्टार्टअप इंडिया उपक्रमांतर्गत, इनक्यूबेटर फ्रेमवर्कचा उद्देश भारतातील स्टार्टअप्सच्या वाढीसाठी पायाभूत सुविधा, मार्गदर्शन आणि आर्थिक सहाय्य यासारखी आवश्यक संसाधने प्रदान करणे आहे. भारतात ४०० हून अधिक इनक्यूबेटर आहेत, त्यापैकी बहुतेक सुरुवातीचा टप्पा. स्टार्टअप इंडियाचे उद्दिष्ट विद्यमान इनक्यूबेटरच्या क्षमता वाढवणे आणि नवीन इनक्यूबेटर स्थापित करण्यासाठी समर्थन प्रदान करणे आहे.

स्टार्टअप इंडियाकडून स्टार्टअप इनक्यूबेटर म्हणून मान्यता मिळाल्याने, स्टार्टअप्सना आर्थिक प्रोत्साहने, कर लाभ आणि सरकारी मदत असे विविध फायदे मिळू शकतात. स्टार्टअप इंडियाचे इनक्युबेशन पार्टनर बनण्यासाठी, संस्थांना सरकारी नियमांचे पालन करून अर्ज करणे आवश्यक आहे आणि संस्था अनुदान, मार्गदर्शन, नेटवर्क आणि भांडवल यासारख्या आवश्यक संसाधनांद्वारे स्टार्टअप्सना सक्षम करण्यासाठी काम करतात. या उपक्रमाशी संबंधित एक अतिरिक्त क्षेत्र म्हणजे या क्षेत्रातील प्रतिबंधात्मक राज्य सरकारच्या धोरणांना काढून टाकणे, जसे की परवाना राज, जमीन, परदेशी गुंतवणूक प्रस्ताव आणि पर्यावरणीय मंजुरी यांच्याशी संबंधित धोरणे. हे उद्योग आणि अंतर्गत व्यापार संवर्धन विभाग - औद्योगिक धोरण आणि प्रोत्साहन विभागाने आयोजित केले होते.

या योजनेचा उद्देश भारतात उत्पादन, वाहतूक, ऊर्जा, आरोग्य, शिक्षण, शेती, पाणी, स्वच्छता इत्यादी विशिष्ट क्षेत्रांमध्ये स्टार्टअप्सना समर्थन आणि प्रोत्साहन देणारी इनक्यूबेशन सेंटर्स स्थापित करणे आणि त्यांना आवश्यक पायाभूत सुविधा प्रदान करणे हा आहे. पायाभूत सुविधा आणि इतर मूल्यवर्धित सेवा प्रदान करा. समावेशक विकासाला पाठिंबा देण्यासाठी अविकसित आणि वंचित प्रदेशांमध्ये अटल इनक्युबेशन सेंटर स्थापन करण्यावर देखील या योजनेचा भर असेल. अधिक माहिती आणि तपशीलवार वर्णनासाठी, तुम्ही इनक्युबेटर फ्रेमवर्क पृष्ठाला भेट देऊ शकता. स्टार्टअप इंडिया इनिशिएटिव्ह ही एक सरकारी उपक्रम आहे ज्याचा उद्देश भारतीय स्टार्टअप इकोसिस्टमला प्रोत्साहन देणे आणि पाठिंबा देणे आहे. या प्रक्रियेत इनक्युबेशन पार्टनर्स महत्त्वाची भूमिका बजावतात. इनक्युबेशन पार्टनर ही एक संस्था किंवा संस्था आहे जी स्टार्टअप्सना ऑपरेशनल, तांत्रिक आणि व्यवसाय समर्थन प्रदान करते.

स्टार्टअप इंडियामध्ये सामील होण्याच्या प्रक्रियेत स्टार्टअप इंडिया पोर्टलवर नोंदणी करणे, स्टार्टअप माहिती, उद्दिष्ट आणि कार्यक्षेत्र असलेले अर्ज भरणे, इनक्यूबेटर प्रोग्रामसाठी संपूर्ण आणि तपशीलवार प्रकल्प अहवाल (व्यवसाय प्रस्ताव) सादर करणे ई. पायऱ्या असतात. तसेच, अर्जदार संस्था संलग्न स्टार्टअप इनक्यूबेटर असणे आवश्यक आहे, तांत्रिक किंवा व्यवसायिक सहाय्य प्रदान करण्याचा अनुभव आणि क्षमता आवश्यक आहे. भारतीय स्टार्टअप इकोसिस्टमला बळकटी देण्यासाठी कायदेशीर नोंदणी आणि इतर औपचारिकता पात्रतेच्या निकषाकरीता आवश्यक आहेत.

इनक्यूबेटर निवड प्रक्रियेचा उद्देश अशा संस्थांची ओळख पटवणे आहे जे स्टार्टअप्सना चांगली संसाधने आणि संधी प्रदान करू शकतात. इनक्यूबेटरचे नेटवर्क किती मोठे आणि प्रभावी आहे हे विचारात घेतले जाते. व्यावसायिक प्रशिक्षण, मार्गदर्शन आणि समुपदेशन, तंत्रज्ञान, सुविधा आणि कामाच्या जागेची उपलब्धता, सरकारी सहाय्य कार्यक्रमांचे धोरणात्मक सूचना आणि फायदे, आर्थिक आणि गैर-आर्थिक प्रोत्साहने, सक्षम इनक्यूबेटर ते स्टार्टअप्सना भांडवली गुंतवणूक, योग्य संसाधने, गुंतवणूकदार नेटवर्क आणि इतर व्यवसाय-संबंधित समर्थन प्रदान करतात. सर्व स्टार्टअप उद्योजकांना स्टार्टअप दिनाच्या शुभेच्छा !

**प्रविण बागडे**
**नागपूर**
**भ्रमणध्वनी : ९९२३६२०९१९**
**ई-मेल : pravinbagdegmail.com**

# राज्य क्रीडा दिनानिमीत्ताने आयोजीत विविध उपक्रमास खेळाडूंसह जेष्ठांचाही सहभाग

लातूर : महाराष्ट्रातील क्रीडा संस्कृतीची जोपासना व जनतेमध्ये क्रीडा वातावरण निर्मीती करण्याच्या दृष्टीने राज्यातील प्रत्येक जिल्ह्यात दरवर्षी स्व.खाशाबाजाधव (कुस्तीचे खेळाडू) यांचा १५ जानेवारी हा जन्मदिन राज्य क्रीडा दिन म्हणून साजरा केला जातो. या अनुषंगाने क्रीडा व खेळाचा प्रचार व प्रसार व्हावा, शहरी व ग्रामीण भागातील नागरिकांपर्यंत क्रीडा व खेळाचे महत्व पोहोचविणे, यासाठी लातूर जिल्ह्यामध्ये जिल्हा क्रीडा अधिकारी कार्यालयामार्फत विविध उपक्रमांचे आयोजन करण्यात आले होते.



१५ जानेवारी रोजी जिल्हा क्रीडा संकुल येथे जिल्हा क्रीडा अधिकारी कार्यालयातर्फे आयोजित विविध उपक्रमाअंतर्गत जिल्हा क्रीडा संकुलामध्ये नियमित सरावासाठी येणाऱ्या खेळाडू , क्रीडाप्रेमी , महिला तसेच जेष्ठ नागरीकांनीही सहभाग नोंदवला. या प्रसंगी राज्य क्रीडा दिनाचे औचित्य साधून सकाळी जिल्हा क्रीडा संकुल येथे रॅलीचे आयोजन करण्यात आले होते. या रॅलीमध्ये कर्मवीर कॅडमी व कमान्डो कॅडमीचे खेळाडू, खेलो इंडीया कुस्ती प्रशिक्षण केंद्रातील कुस्तीपटू, तसेच नियमित व्यायाम करणारे नागरीकांनी रॅलीमध्ये उत्स्फुर्त सहभाग नोंदवला.

रॅलीचा समारोप जिल्हा क्रीडा संकुल येथील खुले प्रेक्षागृह येथे करण्यात आला. याप्रसंगी जिल्हा कौशल्य विकास सहाय्यक आयुक्त बालाजी मरे, कृषी अधिक्षक भास्कर कोळेकर, गट विकास अधिकारी (मनरेगा) संताजी माने, प्रभू जाधव, बाभळगाव पोलीस प्रशिक्षण केंद्राचे उपप्राचार्य वसंत चव्हाण, से.नि. पोलीस उपनिरीक्षक गौतम कांबळे, जिल्हा क्रीडा अधिकारी जगन्नाथ लकडे, तालुका क्रीडा अधिकारी सुरेंद्र कराड, राज्य क्रीडा मार्गदर्शक जयराज मुंढे, क्रीडा अधिकारी चंद्रकांत लोदगेकर, कृष्णा केंद्रे, धिरज बावणे, बाबासाहेब इंगोले हे उपस्थित होते. या कार्यक्रमाचे सूत्रसंचलन क्रीडा अधिकारी कृष्णा केंद्रे यांनी केले, तर आभार जयराज मुंढे यांनी मानले.

तसेच सायंकाळी जिल्ह्यातील विविध खेळाचे अंतरराष्ट्रीय , राष्ट्रीय खेळाडू, उत्कृष्ट मार्गदर्शक यांचा राज्य क्रीडा दिनानिमीत्ताने सन्मान करण्यात आला. याप्रसंगी खेलो इंडीया कुस्ती केंद्र येथील खेळाडूंनी आणि जिम्नॅस्टीकच्या खेळाडूंनी प्रात्यक्षिके सादर केली. यावेळी विभागीय कामगार आयुक्त मंगेश झोले यांच्या हस्ते सर्व आंतरराष्ट्रीय, राष्ट्रीय खेळाडू, उत्कृष्ट मार्गदर्शक यांना स्व.खाशाबा जाधव यांची प्रतिमा व जीवन चरित्रावर आधारित ग्रंथ व पुष्पगुच्छ देऊन सन्मानित करण्यात आले.

## मुंबई पोलिसांनी गवताच्या गंजीतून सुई शोधून काढली, अखेर सैफ अली खानच्या घराबाहेरच्या सीसीटीव्ही फुटेजमध्ये संशयित दिसलेच

मुंबई :बॉलीवूड अभिनेता सैफ अली खान याच्यावर बुधवारी रात्री घरात शिरलेल्या चोराने धारदार शस्त्राने वार केले होते. या हल्ल्यात सैफ अली खान गंभीररित्या जखमी झाला होता. त्याच्या मानेवर आणि पाठीवर खोलवर जखमा झाल्या होत्या. या घटनेमुळे मुंबईत एकच खळबळ उडाली होती. ही अत्यंत हायप्रोफाईल केस असल्याने मुंबई पोलिसांची तब्बल १५ पथकं या घटनेचा तपास करत आहेत. सुरुवातीला मुंबई पोलिसांना सीसीटीव्ही फुटेजमध्ये सैफ अली खानच्या इमारतीत, गेटवर किंवा मजल्यावर कोणत्याही संशयास्पद व्यक्तीचा वावर दिसून आला नव्हता. त्यामुळे चोर सैफच्या घरात कसा शिरला, हा प्रश्न पोलिसांना सतावत होता. अखेर पोलिसांनी सकाळपासून वेगाने काम करत सैफची इमारत आणि आजुबाजूच्या परिसरातील सर्व सीसीटीव्ही कॅमेऱ्यांचे फुटेज तपासले. या तपासाअंती पोलिसांना एका सीसीटीव्हीच्या फुटेजमध्ये दोन संशयित व्यक्ती आढळून आल्या आहेत.

हे सीसीटीव्ही फुटेज सैफ अली खानच्या घराच्या परिसरातील आहे. यामध्ये दिसणाऱ्या दोन संशयित व्यक्तींपैकी एकाने सैफ अली खानवर हल्ला केला असावा, असा पोलिसांचा अंदाज आहे. मात्र, याबाबत अद्याप पोलीस अंतिम निष्कर्षापर्यंत आलेले नाहीत. परंतु, तपासावेळी पोलिसांच्या हाती आणखी एक माहिती लागली आहे. त्यानुसार सैफच्या इमारतीमध्ये काम करणारा एक व्यक्ती या दोन संशयितांच्या ओळखीचा असून तो या सगळ्यात सामील असावा, असा पोलिसांचा अंदाज आहे. त्यादृष्टीने आता पोलिसांचा तपास सुरु आहे.

पोलिसांनी सध्या या दोन संशयित व्यक्तींना शोधण्यासाठी आपली पथके कामाला लावण्यात आली आहेत. सैफ अली खानवर झालेल्या हल्ल्यानंतर मुंबईत पोलिसांची ७ आणि गुन्हे शाखेची ८ पथके तपास करत आहेत. चोर कोणत्या मार्गाने सैफ अली खानच्या इमारतीत आणि घरात शिरला असावा, याचा शोध घेतला जात आहे. या इमारतीला एक फायर एक्झिट आणि डक्ट एरिया आहे. मात्र, या जागेतून कोणीही आत शिरण्याची शक्यता मुंबई पोलिसांनी तुर्तास फेटाळून लावली आहे.

प्रायव्हेट लिफ्टने घात केला?

सैफ अली खान आणि करिना कपूर हे वांद्रे येथील सतगुरु शरण या इमारतीमध्ये राहत होते. इमारतीच्या १२ व्या मजल्यावर सैफ अली खानचे घर होते. या घरात जाण्यासाठी एक खासगी लिफ्ट होती. या लिफ्टनेच चोर घरात शिरला असवा, असा पोलिसांचा अंदाज आहे. मात्र, ही प्रायव्हेट लिफ्ट ॲक्सेस कार्डशिवाय वापरता येत नाही. त्यामुळे हा चोर घरातील कोणत्या व्यक्तीच्या मदतीनेच आत शिरला असावा, असाही अंदाज वर्तवण्यात येत आहे.

सैफ अली खानवर शस्त्रक्रिया

सैफ अली खान याच्यावर चोराने एकूण सहा वार केले. त्यापैकी त्याच्या मानेवर १० इंचाची खोल जखम झाली आहे. तर पाठीत धारदार शस्त्राचे पाते रुतून बसले होते. सैफ अली खानला लिलावती रुग्णालयात दाखल केल्यानंतर त्याच्यावर तातडीने शस्त्रक्रिया करण्यात आली. त्यावेळी त्याच्या पाठीतील रुतलेले शस्त्राचे पाते काढण्यात आले.

## नाशिकमधील गुरव आत्महत्येचं कोडं उलगडणार, पोलीस तपासाला गती, समोर आली मोठी माहिती

नाशिक :पंचवटीत परिसरात राहणाऱ्या एका सराफा व्यावसायिकाने ॲसिड प्राशन करुन सोमवार (दि. १३) रोजी आत्महत्या केल्याची घटना घडली होती. पित्याने आत्महत्या केल्याचा धक्का सहन न झाल्याने मुलाचाही हृदयविकाराने मृत्यू झाला होता. या प्रकरणी पंचवटी पोलिसांनी आकस्मिक मृत्यूची नोंद केली असून या प्रकरणाचा तपास सुरू केला होता. आता पंचवटीतील गुरव आत्महत्येचे कोडं सुटणार आहे.

याबाबत अधिक माहिती अशी की, प्रशांत आत्माराम गुरख (४९) आणि अभिषेक प्रशांत गुरव (२९, दोघे रा. राम राज्य, उत्तर दरवाजा, काळाराम मंदिर, पंचवटी) यांचे सराफ बाजारात गेल्या काही वर्षापासून ज्वेलरी दुकान आहे. यातून ते सोने-चांदी विक्री करत होते. या दरम्यान प्रशांत गुरव यांचे अनेकांशी व्यावसायिक व इतर मालमत्तसंदर्भात व्यवहार होते. यात त्यांचे मोहनशेठ सचदेव यांच्या समवेत देखील काही व्यवहार होते.

तुम्ही माझ्या आत्महत्येस सर्वस्वी जबाबदार आहात

त्यातच गुरव यांना अडचणी असल्याने ते तणावात होते. याच तणावातून त्यांनी सोमवार (दि. १३) रोजी सकाळी सहा ते साडेसात वाजेदरम्यान मोबाइलवरुन मोहनशेठ सचदेव यांना त्यांच्या मोबाइलवर व्हॉट्सअप मेसेज करून 'तुम्ही माझ्या आत्महत्येस सर्वस्वी जबाबदार आहात', असा मेसेज व एक फोटो पाठविला. परंतु तो मेसेज त्यांना गेला नाही. त्यानंतर गुरव यांनी काही वेळातच ॲसिड पिऊन आत्महत्या केल्याचा पोलिसांना संशय आहे.

वडिलांची ॲसिड पिऊन आत्महत्या, मुलाचा धक्क्याने मृत्यू

ॲसिड पोटात गेल्याने प्रशांत यांना त्रास होत होता. त्यावेळी दुसऱ्या रुममध्ये झोपलेला त्यांना मुलगा अभिषेक जागा झाला. त्याने वडिलांच्या रुमकडे धाव घेतली असता ते ओरडत असल्याचे दिसून आले. त्याने हे बघताच अभिषेकला धक्का बसून याबाबत नातलगांना माहिती दिली. याच दरम्यान अभिषेकला त्रास होऊन त्याच्या तोंडातून फेस आला व हातपाय ताणले जाऊ लागल्याने तो बेशुद्ध पडला. नातलगांनी दोघांनीही वेगवेगळ्या रुग्णालयात दाखल केले असता वैद्यकीय अधिकाऱ्यांनी तपासून दोघांना मयत घोषित केले.

सुसाईड नोटनुसार तपासास सुरुवात

या प्रकरणाचा पंचवटी पोलीस तपास करत असून आता गुरव आत्महत्येचे कोडं सुटणार आहे. सुसाईड नोटनुसार पोलिसांनी तपासास सुरुवात केली आहे. बापाने आत्महत्या केल्याचे तर मुलाचा धक्क्याने मृत्यू झाल्याचे पोलिसांच्या तपासात उघड झाले आहे. सुसाईड नोटमध्ये नामोल्लेख असलेल्या संशयितांवर लवकरच गुन्हा दाखल केला जाणार असल्याची माहिती पोलिसांनी दिली आहे. सोलापूर येथे गुंतवणूक केल्यानंतर त्यात वारंवार अडचणी येत असल्याने प्रशांत हे तणावात होते. गुरव आत्महत्या प्रकरणाचा गांभीर्याने तपास सुरु करत जाबजबाब नोंदवण्याची कार्यवाही सुरु करण्यात आल्याची माहिती उपायुक्त प्रशांत बच्छाव यांनी दिली आहे.

## लाडक्या बहिणींची संक्रात झाली कडू, १५०० साठी आणखी किती दिवस वाट पाहावी लागणार?

मुंबई :मुख्यमंत्री माझी लाडकी बहिण योजनेत आतापर्यंत महिलांच्या खात्यात सहा हप्ते जमा झाले आहेत.जानेवारी महिन्यात सातवा हप्ता महिलांच्या खात्यात जमा होणार आहे. संक्रातीच्या मुहूर्तावर हा हप्ता जमा होणार,अशी चर्चा होती. यामुळे लाडक्या बहिणींची संक्रात गोड होणार होती. मात्र महिलांच्या खात्यात अद्याप पैसेच आले नाहीयेत. त्यामुळे लाडक्या बहिणींची संक्रात कडू झाली आहे.त्याचसोबत आता १५०० रूपयांसाठी आणखीण किती दिवस वाट पाहावी लागणार? असा प्रश्न लाडक्या बहिणी उपस्थित होते आहे.




लाडक्या बहिणींना १५०० रूपयांचा हप्ता देण्यासाठी सरकार संक्रातीचा मुहूर्त साधणार असल्याची चर्चा होती. मात्र संक्रात होऊन दोन दिवस उलटले आहेत. मात्र अद्याप महिलांच्या खात्यात पैसे आले नाहीयेत. त्यात आज राज्य मंत्रिमंडळाच्या बैठक होणार आहे.राज्य मंत्रिमंडळाच्या बैठकीत हप्ता देण्याचे निर्णय होतात. पण आजच्या बैठकीत जानेवारीचा हप्ता देण्याबाबत अद्याप कुठलाच निर्णय घेतला गेला नाही. त्यामुळे लाडक्या बहिणींना जानेवारीच्या हप्त्यांसाठी वाट पाहावी लागणार आहे.

जानेवारी अर्धा महिना आता उलटला आहे. सरकारच्या हातात शेवटचे १४ उरले आहेत. त्यामुळे आता इतक्या दिवसात सरकार कधी निर्णय घेते? याकडे सर्वांचे लक्ष लागले आहेत. त्यात डिसेंबरचा हप्ता महिलांना उशिराने मिळाला होता. त्यामुळे डिसेंबरप्रमाणेच जानेवारीचा हप्ता महिलांना उशिरा मिळणार आहे का? असा सवाल उपस्थित होते आहे.

महिलांच्या अर्जाची छानणी सूरू दरम्यान मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजनेतील लाभार्थी महिलांच्या अर्जाची छानणी सरकारने सूरू केली आहे.त्यानुसार ज्या महिला निकषात बसणार नाहीत त्या महिलांना त्यांचे पैसे सरकारला परत करावे लागणार आहे. त्यात राज्यातील अनेक शेतकरी महिला आहेत, ज्या नमो शेतकरी सन्मान योजनेचा लाभ घेत आहेत. त्या शेतकरी महिलांचे अर्ज आता बाद होण्याची शक्यता आहे. कारण सरकारने ज्या महिला इतर सरकारी योजनांचा लाभ घेत आहेत, त्यांना १५०० रूपये न मिळण्याची तरतूद आहे. त्या या शेतकरी महिलांना मोठा धक्का बसला आहे

## कृत्रिम बुद्धिमत्ता, बायोटेक, क्रिप्टो, ड्रोन आणि अँटी ड्रोन, इलेक्ट्रिक एनर्जी गुंतवणुकीसाठी आघाडीची क्षेत्रे

मुंबई : कृत्रिम बुद्धिमत्ता, बायोटेक, क्रिप्टो, ड्रोन आणि अँटी ड्रोन, इलेक्ट्रिक एनर्जी ही गुंतवणुकीसाठी आघाडीची क्षेत्रे आहेत, असे मत नवीन कल्पना, तंत्रज्ञानावर आधारित स्टार्टअप्स, स्टार्टअप्स मधील गुंतवणूक या विषयी द्वितीय चर्चा सत्रात जिओ जेन नेक्स्टचे प्रमुख अमेय माशेलकर, जीतो इनक्युबेशनचे अध्यक्ष जिनेंद्र भंडारी, व्हेंचर कॅटालिस्ट अँड नाईन युनिकॉर्न, सह-संस्थापक, अपूर्व रंजन शर्मा, सह-संस्थापक आणि कार्यकारी उपाध्यक्ष अवेंडसचे राणू वोहरा, सह संस्थापक ई व्हि कॅम्प आशिष वाढवणी यांनी व्यक्त केले.

वांद्रे-कुर्ला संकुल येथील जिओ वर्ल्ड सेंटरमध्ये कौशल्य, रोजगार, उद्योजकता व नाविन्यता विभागांतर्गत राज्य नाविन्यता सोसायटीच्यावतीने एम्पॉवरींग इनोव्हेशन, एलिव्हेटिंग महाराष्ट्र (एुांशीळपस खपर्पीरींळेप,एश्रर्शींरींळपस चरहरीरीह्रींर) या संकल्पनेवर आधारित 'राष्ट्रीय स्टार्टअप्स दिवस' कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते.या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन कौशल्य विद्यापीठाच्या कुलगुरू डॉ.अपूर्वा पालकर यांनी केले.

या चर्चासत्रात नवीन कल्पना, तंत्रज्ञानावर आधारित स्टार्टअप्स, स्टार्टअप्स मधील गुंतवणूक, शैक्षणिक संस्थांची भूमिका, सर्जनशीलता इत्यादींविषयी सखोल चर्चा करण्यात आली. महाराष्ट्रात स्टार्टअप्सना पूरक असे अनेक घटक आहेत. स्टार्टअप्सची सुरुवात करताना तुम्ही निर्भय असणे आवश्यक आहे उद्योजकतेतील धोरणात्मक परिणाम उद्योजकांच्या महत्त्वाकांक्षेवर अवलंबून असते असे मत आशिष यांनी व्यक्त केले. स्टार्टअप्स शैक्षणिक संस्थांची भूमिका देखील तितकीच महत्त्वपूर्ण असते. आज हे तंत्रज्ञानाचे जग असून नाविन्यता ही केंद्रस्थानी आहे.

तृतीय चर्चासत्रात स्टार्टअप्समध्ये महिलांचे सक्षमीकरण' या चर्चासत्रात ओपन सिक्रेटच्या संस्थापिका अहाना गौतम, सुपर बॉटमच्या मुख्य कार्यकारी अधिकारी पल्लवी उत्तगी, उद्योजिका श्रेया घोडावत, रिचीवलीच्या मुख्य कार्यकारी अधिकारी विभा कागाजी यांनी चर्चासत्रात सहभाग घेतला. सूत्रसंचालन सर्जन सलोनी पटवर्धन यांनी केले.

आहाना गौतम या स्वतःचा अनुभव सांगताना म्हणाल्या की, 'लहानपणापासूनच मी माझ्या आईला माझ्यासाठी काम करताना पाहून तिच्यातून प्रेरणा घेतली. त्यामुळेच मला देखील उद्योग क्षेत्रात येण्याची ईच्छा झाली. महिलांना काम करताना नेहमी पुरुषांची साथ असते त्यामुळेच महिला देखील पुढे जाऊ शकतात' असे मत व्यक्त केले. वैयक्तिक आलेले अनुभव आणि समाजातील अनुभव यातून महिला उद्योजक देखील स्टार्टअप्समध्ये येत आहेत ही अत्यंत आनंदाची गोष्ट आहे. महिला ही जबाबदारीने काम करत आहेत. कोणत्याही कठीण परिस्थितीवर मात करता येऊ शकते हे महिलांनी अनेक क्षेत्रात आपला ठसा उमटून सिद्ध केले आहे, असे मत महिला उद्योजकांनी यावेळी व्यक्त केले.

## अपघातग्रस्त नौका मालकाला मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते नुकसान भरपाई

मुंबई : मुंबईतील समुद्रात चीन देशाच्या माल वाहतूक जहाजाने धडक दिल्याने २८ डिसेंबर २०२४ रोजी मासेमारी नौकेचे नुकसान झाले होते. त्या मालवाहू जहाजाच्या कंपनीने नुकसान भरपाई देण्याचे मान्य केले होते. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते १८ लक्ष ५५ हजार रूपयांचा धनादेश नुकसानग्रस्त नौकेच्या मालकाला प्रदान करण्यात आला.



मंत्रालयात मंत्री परिषद संपल्यानंतर नुकसानग्रस्त नौका मालकाला धनादेश देण्यात आला. या वेळी मत्स्यव्यवसाय विकास मंत्री नितेश राणे यांच्यासह मंत्रिमंडळातील सदस्य उपस्थित होते.

२८ डिसेंबरला मुंबई समुद्रात हेमदीप टिपरी यांच्या मालकीच्या तिसाई या मासेमारी नौकेला मालवाहतूक जहाजाने धडक दिली होती. या धडकेत सुदैवाने जीवितहानी झाली नसली तरी मासेमारी नौकेचे मोठे नुकसान झाले होते.स्थानिक परवाना अधिकारी, सागरी पोलीस, बंदर निरीक्षक व मच्छीमार संस्थांचे प्रतिनिधी यांच्या समक्ष पंचनामा केला होता. त्यानुसार रुपये १८ लक्ष ५५ हजार रुपयांचे नुकसान झाले असल्याचे सांगितले.

बंदरे विकास व मत्स्य व्यवसाय मंत्री नितेश राणे यांच्या सूचनेनुसार संबंधित जहाज कंपनी व अपघातग्रस्त नौका मालक यांची बैठक बोलवण्यात आली होती. त्या बैठकीत कंपनीने नुकसान भरपाई देण्याचे मान्य केले होते. या नुकसान भरपाईचा धनादेश आज मुख्यमंत्री श्री. फडणवीस यांच्या हस्ते श्री. टिपरी यांना प्रदान करण्यात आला.

## महात्मा बसवेश्र्वर महाविद्यालयात राष्ट्रपती पोलीस पदक सन्मानित माजी विद्यार्थी सय्यद रहेमान यांचा सत्कार संपन्न

लातूर : श्री महात्मा बसवेश्र्वर शिक्षण संस्था, लातूर



द्वारा संचलित महात्मा बसवेश्र्वर महाविद्यालयातील माजी विद्यार्थी राष्ट्रपती पोलीस पदक सन्मानित सय्यद रहेमान यांचा महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. संजय गवई यांनी नुकताच सत्कार केला यावेळी कार्यालय प्रमुख नामदेव बेंदरगे यांची उपस्थिती होती.

माजी विद्यार्थी सय्यद रहेमान सन १९८१-८२ यावर्षी या कला शाखेमध्ये त्यांनी शिक्षण घेतले असून पोलीस अधीक्षक कार्यालय, लातूर येथे त्यांनी सहाय्यक पोलीस सब इन्स्पेक्टर म्हणून कार्य केले आहे. त्यांचा सन २०१५ मध्ये पोलीस महासंचालक, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांनी सन्मानचिन्ह देऊन गौरविले. तसेच २०१८ साली त्यांना लातूर भूषण पुरस्कार सुद्धा प्राप्त झाला आहे. सन २०१९ रोजी न्यायमूर्ती श्रीमती रंजना देसाई, सर्वोच्च न्यायालय, नवी दिल्ली यांच्या हस्ते राष्ट्रीय न्याय गौरव पुरस्कार सुद्धा त्यांना मिळालेला आहे. क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले राज्यस्तरीय पुरस्काराने २०२४ मध्ये ते सन्मानित झाले आहे. त्यांनी आतापर्यंत विविध शाळा आणि महाविद्यालयात एन. एस. एस., एन. सि. सी. शिबिरामध्ये व्यक्तिमत्व विकासावर मार्गदर्शन सुद्धा केले आहेत.

त्यांच्या या उज्वल परंपरेसाठी त्यांचा महाविद्यालयात सत्कार करण्यात आला व पुढील वाटचालीसाठी हार्दिक शुभेच्छा देण्यात आल्या.

## विलासराव देशमुख फाउंडेशनचा महिला सशक्तीकरणाचा नवा उपक्रम लातूरमध्ये मोफत ब्युटी पार्लर प्रशिक्षण केंद्र सुरु

लातूर प्रतिनिधी: विलासराव देशमुख फाउंडेशनने महिलांना



स्वावलंबी बनविण्याच्या दिशेने आणखी एक पाऊल पुढे टाकले आहे. ट्वेंटीवन ग्रीच्या संचलिका सौ.अदिती अमित देशमुख यांच्या संकल्पनेतून लातूर शहरात महीलांना स्वंयरोजगार आणि स्वालंबनासाठी विविध उपक्रमाचे आयोजन करण्यात करण्यात येत आहे. या अंतर्गत लातूर मधील औसा रोड येथे विलासराव देशमुख फाऊंडेशन व अपर्णा वाघे मेकओव्हरच्या वतीने महिलांना स्वावलंबी बनविण्यासाठी मोफत ब्युटी पार्लर प्रशिक्षण केंद्राची सुरूवात करण्यात आली आहे.

महिला सशक्तीकरणाकडे एक पाऊल: ग्रामीण भागाबरोबरच शहरी भागातही महिलांसाठी रोजगाराच्या संधी कमी असतात, या पार्श्र्वभूमीवर विलासराव देशमुख फाउंडेशन महिलांना मोफत प्रशिक्षण देऊनस्वयंरोजगार उपलब्ध करून देण्याच्या दिशेने प्रयत्नशील आहे. या प्रशिक्षण केंद्रामध्ये महिलांना पार्लर विषयीची प्राथमिक माहिती देऊन प्रशिक्षण दिले जाणार आहे. यामध्ये वॅक्सिंग, विविध हेअर कट, मॅनिक्युअर, पेडिक्युअर, थ्रेडिंग, मेकअप, फेशियल याविषयी प्रशिक्षण देण्यात येणार आहे.

प्रशिक्षण केंद्राचा शुभारंभ: या मोफत ब्युटी पार्लर प्रशिकक्षण केंद्राच्या शुभारंभ कार्यक्रमास संस्थेच्या समन्वयक संगीता मोळवणे, गणेश एस.आर.देशमुख, प्रशिक्षक अपर्णा वाघे, रेणूका शिंदे, अविनाश देशमुख, श्रीमती नागरगोजे, श्रीमती माने, गजानन बोयणे तसेच या परीसरातील महिला मोठ्या प्रमाणात उपस्थित होत्या.

## दयानंद कॉलेज ऑफ फार्मसी येथे पोस्टर प्रेझेंटेशन स्पर्धा व बक्षीस वितरण थाटात संपन्न

लातूर :- दयानंद शिक्षण संस्थेच्या दयानंद कॉलेज ऑफ



फार्मसी येथे भव्य अशी पोस्टर प्रेझेंटेशन स्पर्धा संपन्न झाली.याच प्रसंगी विविध स्पर्धेतील यशस्वी विद्यार्थ्यांसाठी बक्षीस वितरण मोठ्या थाटात करण्यात आले.या प्रसंगी प्रमुख पाहुणे म्हणुन लातूरचे समाज कल्याण विभागाचे उपायुक्त अविनाश देवशटवार व लातूर कॉलेज ऑफ फार्मसी चे प्राचार्य डॉ.नितीन लोणीकर हे उपस्थित होते,तसेच मंचावर महाविद्यालयाच्या प्राचार्या डॉ. क्रांती सातपुते,शैक्षणिक विभाग प्रमुख डॉ.समीप सोनवणे यांची उपस्थिती होती.या प्रसंगी प्रमुख पाहुण्यांचे शाल व बुके देऊन स्वागत करण्यात आले. प्रमुख पाहुण्यांच्या व मान्यवरांच्या हस्ते सरस्वती पूजन व दीप प्रज्वलन करून कार्य कर्मास सुरुवात झाली.

महाविद्यालयातील डी. ,बी. आणि एम.फार्मसी च्या विद्यार्थ्यांनी बनवलेल्या पोस्टर प्रेझेंटेशन स्पर्धेचे प्रमुख पाहुण्यांच्या हस्ते फीत कापून उदघाटन करण्यात आले.पोस्टर प्रेझेंटेशन स्पर्धेत महाविद्यालयातील ३६ विद्यार्थ्यांनी सहभाग नोंदविला.याच प्रसंगी प्रमुख पाहुण्यांच्या हस्ते सिंगिंग,मिमिक्री,वनॲक्ट प्ले,पोस्टर प्रझेंटेशन,बेस्ट फोटोग्राफी,फार्मामॉडेल मेकिंग,रिझुम अँड लिंक्डइन प्रोफाइल,व्हिडिओ मेकिंग,बॅडमिंटन आणि चेस ई. विविध स्पर्धेतील विजेत्या विद्यार्थ्यांना भेटवस्तू व प्रमाणपत्र देऊन गौरविण्यात आले.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन व आभार प्रदर्शन डॉ. अर्चना येलमटे यांनी केले. याप्रसंगी महाविद्यालयातील डी. ,बी. आणि एम. चे सर्व विद्यार्थी, विद्यार्थिनी,शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचारी उपस्थित होते.

# जुन्या टीव्हीमधून खरेच निघते का सोने? हातोडा वापरण्यापूर्वी जाणून घ्या सत्य



बरे, सोशल मीडियावर काहीही व्हायरल होते आणि लोक कशावरही विश्वास ठेवतात. तथापि, जर आपण म्हणतो की आपला जुना टीव्ही तोडल्याने बरेच सोने मिळू शकते, तर तुमचा विश्वास बसेल का? जर तुम्ही टीव्ही तोडला आणि त्यातून सोने बाहेर आले, तर काय होईल याची कल्पना करा. खरं तर, सध्या सोशल मीडियावर एक व्हिडिओ व्हायरल होत आहे, ज्यामध्ये जुन्या टीव्हीमधून सोने बाहेर येत असल्याचे दाखवण्यात आले आहे.

बरं, जर तुम्ही व्हिडिओ खरा मानला, तर तुम्हाला बरंच काही सोनं मिळू शकतं, पण जर तुम्ही त्याची सत्यता पाहिली, तर त्यावर विश्वास ठेवणेही कठीण होईल. येथे जाणून घ्या की जुन्या टीव्हीमधून सोने खरोखरच बाहेर येते की लाईक्स आणि टिप्पण्या मिळविण्याच्या या युक्त्या आहेत.

आता प्रश्न येतो की जुना बॉक्स टीव्ही तुम्हाला खरोखर श्रीमंत बनवू शकतो का. यातून खरेच सोने काढता येईल का? आम्ही तुम्हाला सांगतो की जर तुम्ही तुमचा जुना टीव्ही तोडला, तर त्याचे सर्व भाग तुमच्या सम ेर येतील. भाग जोडण्यासाठी तांबे वापरतात. तांबे आणि सोन्याचा रंग थोडासा सारखा असतो. अशा स्थितीत व्हायरल व्हिडिओमध्ये दाखवण्यात आलेले सोने तांबेही असू शकते.

टीव्ही, एसी, पंखे यांसारख्या विजेवर चालणाऱ्या वस्तू जोडण्यासाठी तांब्याचा वापर केला जातो. कारण तांबे हा विजेचा उत्तम वाहक आहे. मुक्त इलेक्ट्रॉन धातूमध्ये फिरू शकतात आणि धातू वीज चालवू शकते.

व्हायरल व्हिडिओमध्ये एक व्यक्ती हातोड्याने टीव्ही तोडताना दिसत आहे, तर ती व्यक्ती सांगत आहे की, टीव्ही जितका जुना आहे, तितके जास्त सोने वापरले आहे. त्या व्यक्तीने टीव्हीचे सर्व भाग फोडले आणि ते सोन्याचे असल्याचा दावा केला. या व्हिडिओच्या कमेंटमध्ये अनेकांनी त्याची खिल्ली उडवली, तर काहींनी ते चुकीचे असल्याचे सिद्ध केले.

खरे तर ते सोने नाही, वर म्हटल्याप्रमाणे, टीव्ही, एसी सारख्या विजेवर चालणाऱ्या सर्व उत्पादनांमध्ये तांब्याचा वापर केला जातो. तांब्याचा रंग सोन्यासारखाच असतो, त्यामुळे काही लाइक्स आणि कमेंट्स गोळा करण्यासाठी ही व्यक्ती तांब्याला सोने म्हणत प्रेक्षकांचे लक्ष वेधून घेत आहे.

## (गुरु वचन),मानवास हावरटपणा मारक - महंत गोपालदास

प्रत्येक व्यक्तीने आपल्या क्षमतांचे निरीक्षण केले पाहिजे व हावरटपणाविषयी नेहमी सावध राहिले पाहिजे. जे हावरट असतात ते आपली भूक, झोप इत्यादी सर्व गमावून बसतात. इच्छा नियमित केल्यामुळे आरोग्य सुदृढ राखण्यात मदत होते व जीवन नैसर्गिक नियमांनुसार चालते. हे नियम किंवा शिस्त म्हणजे इच्छा दाबणे नसून आपल्या क्षमतेनुसार समतोल राखणे आहे. जास्त खाणे, झोपणे, जागरण आरोग्यासाठी हानिकारक आहे. असे केल्यामुळे शरीरातील विविध यंत्रणा बिघडतात व जीवनाचा उद्देश्यच नष्ट होतो. यामुळे मेंदू क्षीण होतो, हीनभावना निर्माण होते व आत्मविश्वास नष्ट होतो. क्रोध दूसरा नकारात्मक संवेग आहे जो तार मुळ प्रवृत्तीतून निर्माण होतो. जेव्हा एखाद्याची इच्छा पुर्ण होत नाही तेव्हा त्याचे उद्विग्न होते व त्यातून संताप निर्माण होतो म्हणून व्यक्तीने संताप कसा नियंत्रित करावा? हे जाणले पाहिजे.

सर्वप्रथम व्यक्तीने हे लक्षात घेतले पाहिजे की, कुठली इच्छा त्याच्या विकासात सहायक आहे किंवा मारक आहे. जर बुद्धीला शिस्त लावली तर या कामात मदत मिळेल. जर एखाद्या व्यक्तीने ही योग्यता आपल्यात विकसित केली तर राग आल्यानंतर तो स्वतः विषण करेल की, तो का चिडला व त्याची कुठली इच्छा पुर्ण झाली नाही. असे करुन त्यास आपल्या रागाचे कारण समजू शकेल.

## उपदेशकथा,दृढ संकल्प

कालीदास मंद बुद्धीचा काळा कुरुप व्यक्ती होता. ज्या फांदीवर बसला होता तिलाच कापत होता. जंगलात त्याला या अवस्थेत बसलेले पाहुन राजसभेतून विद्योत्तमाद्वारे अपमानित पंडितांनी त्या पंडितेस शास्त्रात हरवणे व तिच्यासोबत लग्न करण्याचा कट आखण्यासाठी कालीदासला श्रेष्ठ पात्र मानले. शास्त्रात आपल्या कुटीलतानेे त्यास मौन विद्वान समजून त्यांनी प्रत्येक प्रश्नाचे समाधान अशाप्रकारे केले की विद्योत्तमाने त्या महामुर्खासमोर पराभव कबुल करत त्यास आपला पती स्वीकारले. पहिल्याच दिवशी जेव्हा त्याला वास्तविकता कळाली तेव्हा तिने त्याला घरातून हाकलून लावले. हाकलताना ज्या शब्दात तिने त्याचा अपमान केला, तो त्याच्या जिव्हारी लागला. दृढ संकल्प अर्जित करत तो आपल्या ज्ञान वृद्धी लागला. अखेरीस तोच महामुर्ख आपल्या अध्ययनाने कालांतराने 'महाकवी कालीदास' रुप प्रकट झाला व आपल्या विद्वतेची साधना पुर्ण करुन विद्योत्तम ासोबत त्याचे पुनर्मिलन झाले.

## महाराष्ट्राचा विवेकी आवाज ; प्रा डॉ एन डी पाटील

फुले, शाहू, आंबेडकरी विचारांचा पुरोगामी वारसा चालवणारे सत्यशोधक विचारवंत प्रा डॉ एन डी पाटील यांचा आज तिसरा स्मृतिदिन. तीन वर्षापूर्वी आजच्याच दिवशी म्हणजे १७ जानेवारी २०२२ रोजी प्रा डॉ एन डी पाटील यांचे निधन झाले होते. प्रा डॉ एन डी पाटील यांचे पूर्ण नाव नारायण ज्ञानदेव पाटील असे असून त्यांचा जन्म १५ जुलै १९२९ रोजी सांगली जिल्ह्यातील नागाव मधील ढवळी येथे एका गरीब शेतकरी कुटुंबात झाला. घरची परिस्थिती गरिबीची असूनही त्यांनी आपले शिक्षण पूर्ण केले. प्रा डॉ एन डी पाटील यांनी पुणे विद्यापीठातून अर्थशास्त्रातून एम ए आणि एल एल बी चे शिक्षण घेतले.

प्रा डॉ एन डी पाटील यांनी १९५४ ते १९५७ या कालावधीत सातारा येथील छत्रपती शिवाजी कॉलेजमध्ये अध्यापनाचे कार्य केले. याशिवाय त्यांनी कमवा आणि शिका योजनेचे रेक्टर म्हणूनही काम पाहिले. १९६० साली ते इस्लामपूर येथील कर्मवीर भाऊराव पाटील कॉलेजचे प्राचार्य म्हणून रुजू झाले. त्यांच्यावर कर्मवीर भाऊराव पाटील यांच्या विचारांचा मोठा प्रभाव होता. कर्मवीरांच्या विचारातून प्रेरणा घेऊनच त्यांनी शैक्षणिक क्षेत्रात उल्लेखनीय कार्य केले. शिवाजी विद्यापीठाचे पहिले सल्लागार म्हणूनही त्यांनी काम पाहिले. ( १९६२ ) त्यानंतर शिवाजी विद्यापीठाचे सिनेट सदस्य म्हणूनही त्यांनी काम पाहिले. प्रा डॉ एन डी पाटील यांनी १९६६ ते १९७८ या कालावधीत शिवाजी विद्यापीठात समाजशास्त्र विभागाचे डीन म्हणूनही काम पाहिले. याचबरोबर १९९१ साली त्यांनी महाराष्ट्र राज्य शिक्षण आयोगाचे सदस्य म्हणून काम पाहिले. प्रा डॉ एन डी पाटील हे १९५९ पासून रयत शिक्षण संस्थेचे कौन्सिल मॅनेजमेंट सदस्य म्हणून कार्यरत होते. १९९० साली रयत शिक्षण संस्थेच्या चेअरमनपदी त्यांची नियुक्ती झाली. प्रा डॉ एन डी पाटील यांनी शैक्षणिक क्षेत्रात आपल्या कार्य कर्तुत्वाचा आगळा वेगळा ठसा उमटवला.

शैक्षणिक क्षेत्राप्रमाणेच राजकीय क्षेत्रातही त्यांनी आपल्या कार्य कर्तुत्वाने वेगळा ठसा उमटवला. १९४८ साली त्यांनी शेतकरी कामगार पक्षात प्रवेश केला. त्यानंतर १९५७ साली त्यांनी मुंबईतील गिरणी कामगारांच्या संघटनेचे सरचिटणीस म्हणून काम पाहिले. प्रा डॉ एन डी पाटील यांनी महाराष्ट्राच्या विधान परिषदेत १८ वर्ष सदस्य म्हणून काम केले. १९७८ ते १९८० या काळात ते महाराष्ट्राचे सहकार मंत्री होते. १९८५ साली ते कोल्हापूर मतदार संघातून विधानसभेचे सदस्य म्हणूनही निवडून गेले. १९९९ ते २००२ या काळात ते लोकशाही आघाडी सरकारचे निमंत्रक होते.

आपले आयुष्य समाज कार्यासाठी घालवणाऱ्या प्रा डॉ एन डी पाटील यांना पुरस्काराने गौरविण्यात आले. अनेक विद्यापीठाने त्यांना मानाची डि. लिट पदवी देऊन गौरवले.

प्रा डॉ एन डी पाटील यांनी अनेक विषयांवर सखोल लेखन केले. शेती जमिनीवरील कमाल मर्यादा आणि महाराष्ट्र सरकारचा प्रतिगामी कायदा, समाज विकास योजनेचे वस्त्रहरण, वाढती महागाई आणि ग्राहकांची ससेहोलपट, कॉंग्रेस सरकार आणि शेतकऱ्यांची लूट, शेतीमालाला किफायतशीर किंमतीची हमी आणि घाऊक व्यापाराचे राष्ट्रीयकरण, महाराष्ट्र सरकारच्या श्वेतपत्रिकेचे कृष्णस्वरूप, शेवटी हे शिक्षण आहे तरी कोणासाठी?, महर्षी विठ्ठल रामजी शिंदे ही त्यांनी लिहिलेले पुस्तके गाजली.

प्रा डॉ एन डी पाटील यांनी अंधश्रद्धा निर्मूलन क्षेत्रातही काम केले. त्यांची मते ठाम होती. महाराष्ट्राच्या गेल्या सत्तर वर्षांच्या सामाजिक आणि राजकीय इतिहासात प्रा. डॉ एन डी पाटील हे एक धडाडिचे आणि लढाऊ नेते म्हणून ओळखले जातात. प्रा डॉ एन डी पाटील म्हणजे महाराष्ट्राचा विवेक आवाज. त्यांच्या निधनाने महाराष्ट्राने पुरोगामी आवाज हरपला असे म्हटल्यास वावगे ठरणार नाही. त्यांच्या निधनाने महाराष्ट्राच्या पुरोगामी चळवळीची मोठी हानी झाली. आज त्यांच्या स्मृतिदिनी त्यांना विनम्र अभिवादन!

**श्याम ठाणेदार**
**दौंड जिल्हा पुणे**
**९९२२५४६२९५**

# हे फळ तुमचे वजन कमी करण्यास मदत करू शकते, आजपासून ते तुमच्या आहारात समाविष्ट करा



मिठाई खाणे बंद करून वजन कमी करणे हे गोड प्रेमींसाठी कठीण काम आहे. बहुतेक डॉक्टर आहारात प्रक्रिया केलेली आणि शुद्ध साखर टाळण्याचा सल्ला देतात. तथापि, फळांमध्ये आढळणारी नैसर्गिक साखरेचा वापर केला जाऊ शकतो. खाली काही फळांची यादी दिली आहे जी तुम्ही तुमचे वजन कमी करण्यासाठी खाऊ शकता.

बेरी : बेरीमध्ये कॅलरी आणि इतर अनेक पोषक घटक कमी असतात. यासोबतच आहारातील फायबर, व्हिटॅमिन सी, मॅंगनीज देखील मिळते. बेरीच्या सेवनाने उच्च कोलेस्ट्रॉल पातळी, उच्च रक्तदाब, जळजळ होण्याची समस्या कमी होऊ शकते आणि त्याच वेळी हे फळ वजन कमी करण्यासाठी देखील उपयुक्त आहे.

संत्री : वजन कमी करण्यासाठी तुम्ही तुम च्या आहारात संत्र्याचा समावेश करू शकता. इतर लिंबूवर्गीय फळांच्या तुलनेत संत्र्यामध्ये कॅलरीज खूप कमी असतात. यामध्ये व्हिटॅमिन सी, फायबरचे प्रमाण जास्त असते, जे वजन कमी करण्यास मदत करते. संत्र्याचा रस पिण्याऐवजी सरळ खा.

सफरचंद : सफरचंद वजन कमी करण्यासाठीही खूप फायदेशीर मानले जाते. सफरचंदात कमी प्रमाणात सर्व पोषक घटक मिळतात. असे म्हणतात की जर तुम्ही दिवसातून एक सफरचंद खाल्ले तर तुम्ही आजारांपासून दूर राहता. याशिवाय सफरचंदात भरपूर फायबर असते. ज्या लोकांना वजन कमी करायचे आहे, त्यांना भूक लागल्यावर सफरचंद खावे. सफरचंद खाल्ल्यानंतर आपल्याला खूप वेळ भूक लागत नाही आणि आपली पचनशक्तीही चांगली राहते. सफरचंदाम ध्ये कॅलरीही खूप कमी असतात, ज्यामुळे वजन कमी होण्यास मदत होते. याशिवाय सफरचंद रक्तातील साखर कमी करण्यास, शरीराला डिटॉक्सिफाय करण्यास आणि कोलेस्ट्रॉल कमी करण्यास मदत करते.

टरबूज : वजन कमी करायचे असेल तर उन्हाळ्यात टरबूजाचे सेवन करा. टरबूज सारख्या फळांमध्ये पाण्याचे प्रम ाण जास्त आणि कॅलरीज खूप कमी असतात. त्यामुळे वजन कमी होण्यास मदत होते. या फळांम ध्ये फायबर, अँटिऑक्सिडंटस, पोटॅशियम, व्हिटॅमिन सी, बीटा—कॅरोटीन, लाइकोपीन इ.

पपई : पपई हे वजन कमी करण्यासाठी खूप चांगले फळ आहे. पपईमध्ये फायबर आणि अँटिऑक्सिडंटस चांगल्या प्रमाणात असतात. जे आपल्या शरीरासाठी खूप फायदेशीर असतात. पपईची खास गोष्ट म्हणजे ते आपली पचनसंस्था निरोगी ठेवण्यास मदत करते. पपई खाल्ल्याने चयापचय क्रिया देखील वाढते, त्यामुळे जेव्हाही भूक लागेल तेव्हा पपई खा, त्यामुळे तुम्हाला झटपट ऊर्जा मिळेल.

पेरु : या हंगामात पेरूही येऊ लागतात. पेरू हे गुणांनी परिपूर्ण फळ आहे. पेरूमध्ये फायबरचे प्रमाण चांगले असते. त्यामुळे पोट लवकर भरते. याशिवाय रोगप्रतिकारशक्ती वाढवण्यासाठी पेरू खावा. यामध्ये व्हिटॅमिन सी भरपूर प्रमाणात असते. भूक लागल्यावर तुम्ही पेरू खाऊ शकता. पेरू हे वजन कमी करण्यासाठी सर्वोत्तम फळ आहे. याशिवाय कॅन्सर, उच्च रक्तदाब, अपचन आणि मधुमेह यांसारख्या आजारांवरही ते फायदेशीर आहे.

पाइन ऍपल : पाइन ऍपल वजन कमी करण्यासाठी देखील चांगले मानले जाते. याम ध्ये फायबरचे प्रमाण चांगले असते जे आपल्या आतड्यांना साफ करण्यास मदत करते. पोट साफ करण्यासाठी पाइन अॅपल खाण्याची शिफारस केली जाते. पाइन अॅपलमध्ये ब्रोमेलेन एंजाइम असते जे पचनसंस्था मजबूत करते आणि वजन कमी करते. रोज पाइन अॅपल खाल्ल्यानंतर तुम्हाला तुमच्या वजनात फरक जाणवेल. भूक लागल्यावर तुम्ही पाइन अॅपल खाऊ शकता.

# गृहमंत्रालयाची कारवाई योग्य दिशेने ;राज्यात वाल्मिक कराड सारखे हजारो गुन्हेगार असू शकतात!

संतोष देशमुखांचे ९ डिसेंबर २०२४ ला अपहरण झाले व नंतर त्यांची अमानुषपणे हत्या करण्यात आली व यानंतर चौकशीच्या माध्यमातून अनेक उलघडे सामोर आले.या कारवाई दरम्यान फरार आरोपींना पकडण्यात सुध्दा आले.यात वाल्मिक कराड सुध्दा फरार होता.परंतु वातावरण जास्तच चिघळत असल्याचे पाहून आपल्याला सपोर्टस करणारे राजकीय पुढारी फसु शकतात हे पाहून वाल्मिक कराड पोलिसांना शरण आला. त्यानंतर चौकशी दरम्यान पोलिस विभागाला सर्व आरोपी व वाल्मिक कराडपासुन नवीन-नवीन सुगावे लागत गेले.यावरून स्पष्ट झाले की वाल्मिक कराड सर्वसाधारण व्यक्ती नसून मोठा गुन्हेगार आहे.त्याच अनुषंगाने त्याच्यावर सीआयडीकडुन मकोका लावण्यात आला आहे. बीडच्या याप्रकरणाला एक महिन्यापेक्षा जास्त दिवस लोटून गेले.तरीही तेथील संघर्ष अजूनही शांत झाला नाही.बीड मधील संतोष देशमुख हत्याप्रकरण संपूर्ण महाराष्ट्रासह देशात गाजत आहे.यामुळे बीडची परिस्थिती अतिसंवेदनशील आहे.यामुळे असे वाटत आहे की बीडमध्ये चाललय तरी काय! बीडच्या या हत्याकांडावरून असे लक्षात येते की याठीकाणी गुन्हेगारांनी कोन्हीतरी मोठा नेता खत पाणी घालत असावेत तेव्हाच त्याठिकाणी एवढे मोठे गुन्हेगारांचे जाळे विणलेले दिसून येते. ही हत्या खंडणी प्रकरणातून झाली असल्याचे सांगितले जाते आणि संतोष देशमुख हत्या प्रकरणातील मुख्य सुत्रधाराची सुई वाल्मिक कराडवर जात आहे व आतापर्यंतच्या तपास यंत्रणेच्या माध्यमातून असे लक्षात येते की वाल्मिक कराड हा खंडणी वसूलीच्या बाबतीत मुख्य आरोपी असल्याचे दिसून येते. गुन्हा अन्वेषण विभाग (सीआयडी) यांनी सखोल चौकशी केली तेंव्हा वाल्मिक कराडवर महाराष्ट्र संघटित गुन्हेगारी प्रतिबंधक कायद्यान्वये (मकोका) चार आरोप ठेवण्यात आला.त्यामुळे संतोष देशमुख हत्येचा सूत्रधार मानण्यात येत असल्याने कराडच्या अडचणींत वाढ झाली आहे. त्यामुळे कराड समर्थक आंदोलन करताना दिसत आहे.एकीकडे कराड समर्थक तर दुसरीकडे संतोष देशमुख हत्याप्रकरणाची चौकशी करण्याचे समर्थन करणारे अशा पध्दतीचे दोन गट निर्माण झाल्याने सरकारने बीड जिल्ह्यात २८ जानेवारीपर्यंत जमावबंदी आदेश लागू करण्यात आला आहे.संतोष देशमुख हत्या प्रकरणामुळे जिल्हाभरात विविध संस्था, संघटना, राजकीय पक्ष यांच्याकडून आंदोलन करण्यात येत आहे तर दुसरीकडे कराडवर मकोका लावल्याने त्यांचे समर्थक आगबबुला झाल्याने आंदोलन करीत आहे.यात संघर्ष निर्माण होवू नये म्हणून सरकारने जमावबंदीचे आदेश दिले आहेत ही सुरक्षितेच्या दृष्टीकोनातून महत्वपूर्ण बाब आहे.कारण सध्याच्या परिस्थितीत बीडमध्ये एकीकडे गुन्हेगारांचे समर्थक तर दुसरीकडे गुन्हेगारांचे विरोधक आमनेसामने आल्याचे दिसून येते.गुन्हेगार हा गुन्हेगार असतो त्याला माफी नकोच.पोलिस विभाग, सीआयडी विभाग व अन्य सुरक्षा विभागाचे वाल्मिक कराड बाबद सखोल चौकशी केल्यानंतरच त्यावर मकोका लावण्यात आला आहे ही बाब वाल्मिक कराडच्या समर्थकांनी लक्षात ठेवली पाहिजे व चौकशी करता सरकारला व सुरक्षा विभागाला सहकार्य केले पाहिजे.कारण गुन्ह्याला माफी नकोच.मकोका लावल्यानंतर बीड न्यायालयाकडुन वाल्मिक कराडला ७ दिवसांची एसआयटी कोठडी सुनावण्यात आली आहे.यात आणखी अनेक उलघडे सामोर येवू शकतात. कारण ९ डिसेंबरला सुदर्शन घुले, विष्णू चाटे आणि वाल्मिक कराड यांचे फोनवरून संभाषण झाल्याचे सांगितले जाते यात त्या दिवशी नेमके काय बोलने झाले याचा तपास एसआयटी मार्फत होणार आहे.

यावरून स्पष्ट होते की वाल्मिक कराड सर्वसाधारण गुन्हेगार नसुन याचे गुन्हेगारीचे मोठे जाळे असल्याचे सिद्ध होते.शेवटी गुन्हेगार हा गुन्हेगारच असतो त्यामुळे सर्वांनीच पोलिस विभाग, सीआयडी विभाग व गृहविभागाला सहकार्य करने अत्यंत गरजेचे आहे.कारण बीडच्या या हत्याकांडाच्या प्रकरणावरून लक्षात येते की राज्यात हजारो वाल्मिक कराड राहु शकतात यालाही नाकारता येत नाही.त्यामुळे अशा गुन्हेगारांच्या मुसक्या आवळण्यासाठी सर्वांनीच पोलिस विभागाला सहकार्य करण्याची नितांत गरज आहे.कारण बलात्कार,खंडणी वसुली, हत्या करणे, धमकी देणे,वाळू माफिया व अन्य माफिया असे मोठ-मोठे गुन्हेगार आपल्याला राज्यात दिसून येतात.परंतु या गुन्हेगारांना एखाद्या मोठ्या राजकीय पुढाऱ्यांचा सपोर्ट अवश्य असतो तेंव्हाच तो गुन्हेगार खुलेआम गुन्हा करतांना दिसतात.त्यामुळे सरकारने व गृहविभागाने गुन्हेगारांवर कारवाई तर करावीच सोबत पडद्याच्या मागे असणाऱ्या मोठ्या माश्यांवर सुध्दा कठोर कारवाई व्हायला हवी.जय हिंद!

**लेखक**
**रमेश कृष्णराव लांजेवार**
**(माजी विद्यापीठ प्रतिनिधी, नागपूर)**
**मो.नं.९९२१६९०७७९, नागपूर.**

## राशीभविष्य १७ जानेवारी २०२५

मेष : शुभ रंग : केसरी, शुभ दिशा: उत्तर
रोजच्या कामातून थोडी उसंत मिळेल. त्यामुळे आवडीच्या गोष्टीसाठी वेळ देता येईल.

वृषभ : शुभ रंग:लाल, शुभ दिशा: उत्तर
काही चांगले निर्णय घेऊ शकाल. मुलांच्या दृष्टीने महत्त्वाचे यश दृष्टीक्षेपात येईल. त्याच्या विवाहविषयक बैठका साध्य होतील.

मिथुन:शुभ रंग: हिरवा,शुभ दिशा: उत्तर
मानसिक शांतता मिळविण्यासाठी केलेले प्रयत्न यशस्वी ठरतील. घरातील वृद्धांच्या तब्येतीची विशेष काळजी घ्या.

कर्क : शुभ रंग :गुलाबी,शुभ दिशा:उत्तर
राजकारणातले एखादे पद, सामाजिक चळवळीचे नेतृत्व आपल्या खांद्यावर येणे शक्य.

सिंह : शुभ रंग: पिवळा,शुभ दिशा: पूर्व
आर्थिक ओघ वेगवान राहील. गुंतवणूक सुरक्षितच होईल इकडे लक्ष द्या.

कन्या : शुभ रंग: निळा, शुभ दिशा : पश्चिम
खर्चाची तोंडमिळवणी सहज करता येईल. नोकरी व्यवसायात वरिष्ठांची साथ अपेक्षित अशी मिळेल.

तुळ : शुभ रंग: जांभळा, शुभ दिशा: पश्चिम
इतरांच्या आग्रहाखातर एखादी वस्तू खरेदी करून आणू शकाल. वाहन खरेदीचे स्वप्न साकार होईल.

वृश्चिक:शुभ रंग:केसरी, शुभ दिशा:पश्चिम
अतिशय वाढलेली कार्यक्षमता अतिउत्साहाने कामे करायला प्रवृत्त करील. फक्त कोणतीही गोष्टअति करु नका.

धनु: शुभ रंग: पिवळा, शुभ दिशा: उत्तर
मित्रांचा, सहकाऱ्यांचा पाठिंबा उत्साहवर्धक राहील. मनातली निराशा कुठल्या कुठे जाईल.

मकर: शुभ रंग: लाल,शुभ दिशा: पूर्व
कुटुंबात होणाऱ्या प्रेमाच्या चार गोष्टी उत्साह वाढवतील. पुढे कष्टाचे वाढते प्रमाण परिश्रम करावयाला लावतील.

कुंभ : शुभ रंग :गुलाबी, शुभ दिशा :पूर्व
कोणतेही मोठे निर्णय राबवू नका. घरातील वृद्धांकडे वेळीच व पुरेशा गांभीर्याने लक्ष द्या.

मीन : शुभ रंग: हिरवा, शुभ दिशा: उत्तर
चांगली गुंतवणूक वाढीस लागून व्यवसायाचे विस्तारीकरण चांगले होईल. तब्येतीची काळजी करायची गरज नाही.

## इतिहासात आजचा दिवस १७ जानेवारी २०२५

इतिहासात आजचा दिवस--
१६ जानेवारी
आंतरराष्ट्रीय
१५४७- आयव्हान द टेरिबल या क्रूरकर्मा झारचा राज्याभिषेक.
१९२५- रशियन क्रांतिकारी सभेच्या अध्यक्षपदावरून लिऑन ट्राट्स्कीची हकालपट्टी.
१९९८- सिनेटर जॉन ग्लेन यांची ७७व्या वर्षी अवकाश प्रवासासाठी पुन्हा निवड केल्याचे जाहीर केले. १९६२ मध्ये ते अवकाशातून पृथ्वी प्रदक्षिणा करणारे पहिले अमेरिकन अवकाशवीर ठरले होते.
२००७- बगदाद विद्यापीठातील आत्मघाती हल्ल्यात ६० जण ठार.
२००८ - संगणक सॉफ्टवेअर कंपनी 'अॅपल'ने जगातील सर्वात पातळ (दोन सेंटीमीटरपेक्षाही कमी) 'मॅकबुक एयर' लॅपटॉप बनविला.
राष्ट्रीय
१६८१- संभाजीमहाराजांनी स्वत-स राज्याभिषेक करवून घेतला.
१९३४- बिहारमधील भूकंपात २० हजार लोक ठार २०व्या शतकातील सर्वाधिक हानिकारक भूकंपांपैकी एक मानल्या गेलेल्या या भूकंपात राजेंद्र प्रसाद यांचे कार्य महात्मा गांधीच्या स्तुतीस पात्र ठरले.
२००७- छत्तीसगडमध्ये नक्षलवाद्यांच्या भूसुरुंग स्फोटात ७ सुरक्षा सैनिक शहीद.
२००८ - भारत-पाक सीमेवर बीएसएफमध्ये महिला कर्मचाऱ्यांच्या तैनातीस केंद्रीय गृह मंत्रालयाने मंजुरी दिली.
जन्म
१८९३- रबरी धावांचे - टायर्सचे एक गड्डा घाऊक उत्पादन सुरु करणाऱ्या आँद्रे मिशेलीन या उद्योगपतीचा जन्म.
१९५६- संगीतकार ओ.पी नय्यर यांचा जन्म.
निधन
१७९४- 'डिक्लीन अँण्ड फॉल ऑफ द रोमन एम्पायर' या महान ग्रांथाचा लेखक एडवर्ड गिबनचे निधन.
१८०६- मोठ्या प्रमाणवर धुयाचा साबण बनविण्यासाठी धुण्याच्या सोड्याचे उत्पादक घाऊक प्रमाणात करण्याची पद्धत शोधणाऱ्या निकोलस लब्लांकचे निधन.
१९०१- न्यायमूर्ती महादेव गोविंद रानडे यांचे निधन.
१९३८- सुप्रसिद्ध बंगाली कादंबरीकार शरश्चंद्र चट्टोपाध्याय यांचे निधन.
२००७- कलादिग्दर्शक तुकाराम देसाई यांचे निधन.

## काळा पैसा : काही खातेदारांची नावे उघड




हे पत्रक, मालक, संपादक, प्रकाशक रघुनाथ बनसोडे यांनी मुद्रक महेश मोतीराम राठोड यांनी मयूर ऑफसेट प्रिंटर्स, मेन रोड, मित्र नगर, लातूर, जि.लातूर - ४१३ ५१२ (महाराष्ट्र) येथे छापून कार्यालय दैनिक लातूर प्रभात, पवन कॉलनी, कृपासदन शाळेजवळ, लातूर (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. संपादक - रघुनाथ वाघोजी बनसोडे, मो.८८३०२५०६४५
(पी.आर.बी.कायद्यानुसार संपादकाची जबाबदारी) RNI No.: - MAHMAR/2017/72894